



# दै. राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....






बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२९७ | बुधवार, दि.१९ फेब्रुवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये





## महाकुंभवर मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचे वादग्रस्त विधान

कोलकाताः पश्चिम बंगाल विधानसभेत मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी मंगळवारी (दि.१८) वादग्रस्त विधान केले. त्यांनी उत्तर प्रदेशातील योगी आदित्यनाथ सरकारमधील व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत महाकुंभ २०२५ ला पान २ वर

# केंद्राची परवानगी तरीही राज्यांकडून तूर खरेदीला हरताळ

## १०० टक्के ऐवजी राज्यांचे २५ टक्केच उद्दीष्ट जाहीर

मुंबई । प्रतिनिधी

केंद्र सरकारने राज्यांना १०० टक्के तूर खरेदीची परवानगी दिली आहे. मात्र राज्य सरकारांनी खरेदीचे उद्दीष्ट कमीच ठेवले आहे. महाराष्ट्रात २ लाख ९७ हजार टनांचे उद्दीष्ट ठेवण्यात आले. महाराष्ट्राने राज्यात जवळपास १२ लाख टन उत्पादनाचा अंदाज गृहीत धरून त्याच्या २५ टक्के खरेदीचे उद्दीष्ट जाहीर केले. कर्नाटकनेही एकूण उत्पादनाच्या २५ टक्के म्हणजेच ३ लाख ६ हजार टन खरेदीचे उद्दीष्ट ठेवले आहे. इतरही राज्यांनी असेच उद्दीष्ट जाहीर केले. म्हणजेच केंद्राने तूर उत्पादकांना १०० टक्के खरेदीचे आश्वावासन दिले तरी राज्यांकडून याला हरताळ फासला जात आहे.

केंद्र सरकारने पुढील चार वर्षे १०० टक्के तूर, उडीद आणि मसूर खरेदीची परवानगी दिली. मात्र राज्यांनी तुरीच्या अंदाजित उत्पादनाच्या २५ टक्केच खरेदीचे उद्दीष्ट जाहीर केले. ९ राज्यांनी खरेदी जाहीर करत १३ लाख २२ हजार टन उद्दीष्ट ठेवले. तर महाराष्ट्राने २ लाख ९७ हजार टन खरेदी करणार असल्याचे जाहीर केले. म्हणजेच केंद्राने पूर्ण पान २ वर



### ५ राज्यात खरेदी सुरु

देशभरात १५ फेब्रुवारीपर्यंत १५ हजार टन तुरीची हमीभावाने खरेदी करण्यात आली असून महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि तेलंगणात खरेदीला सुरुवात झाली आहे. १२ हजार शेतकऱ्यांच्या तुरीची खरेदी करण्यात आली, असे केंद्रीय कृषी मंत्रालयाने स्पष्ट केले. इतर राज्यांमध्येही लवकरत तुरीची खरेदी सुरु करण्यात येईल. नाफेड आणि एनसीसीएफमार्फत १०० टक्के तूर खरेदी केली जाईल, असेही कृषी मंत्रालयाने आपल्या प्रसिध्दीपत्रकात म्हटले आहे.

## संतोष देशमुख खून प्रकरणात सुप्रिया सुळेंची एन्ट्री

# न्यायासाठी वेळप्रसंगी अन्नत्याग करणार

## देशमुख कुटुंबाची भेट घेत लढण्याचे दिले आश्वासन; परळीतही महादेव मुंडेंच्या कुटुबियांची घेतली भेट

बीड । प्रतिनिधी

संतोष देशमुख खून प्रकरणात ६९ दिवस झाले तरी सातवा आरोपी कृष्णा आंधळे हा पोलिसांना सापडला नाही. जोपर्यंत आरोपींना फाशी होत नाही तोपर्यंत हा लढा सुरु राहणार असून न्यायासाठी वेळप्रसंगी मी अन्नत्याग करण्यास तयार आहे. मात्र गावकऱ्यांनी तसे पाऊल उचलू नये, असे आवाहन खा. सुप्रिया सुळे यांनी केले. मस्साजोग येथे त्यांनी देशमुख कुटुंबियांची भेट घेऊन धीर दिला. तसेच यापुढे देशमुख कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी आपण सज्ज असल्याचे संकेत त्यांनी दिल्याने त्यांची आता या प्रकरणात एन्ट्री झाल्याचे दिसत आहे. तर दुसरीकडे मस्साजोगनंतर सुळे यांनी परळी येथे जाऊन महादेव मुंडे यांच्या कुटुंबियांची भेट घेतली. पान २ वर



### आम्हाला धनंजय मुंडे यांचा राजीनामा नको– सुप्रिया सुळे

धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यायला हवा का असा सवाल केला असता सुळे म्हणाल्या की, आम्हाला राजीनामा नाही पाहिजे, त्या न्याय प्रक्रियेत कोणी कोणाला लपवण्याचा प्रयत्न करत असेल तर त्या माणसाला दूर केले पाहिजे हा आमचा आग्रह आहे असेही सुप्रिया सुळे म्हणाल्या.

### अनैतिक संबंधातून ही हत्या दाखवण्याचा प्लॅन होता –धनंजय देशमुख

संतोष देशमुख हत्या प्रकरणी नवीन खुलासे झाले आहेत. त्यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी गंभीर आरोप केले आहेत की, संतोष यांचा मृतदेह कळंबकडे वळवण्याचा प्रयत्न झाला होता. एक महिलावर अत्याचार करून हत्या दाखवण्याचा कट होता, असा दावा केला आहे. छेडछाड झाली, कपडे फाडून घेतले असते, अंगाला जखम करून घेतल्या असत्या आणि या माणसाने असे केले म्हणून या माणसाला समाजातून उठवले असते, असा त्यांचा प्लॅन होता, असा गंभीर आरोप धनंजय देशमुख यांनी केला. मात्र कळंबपर्यंत जाण्याआगोदरच संतोष देशमुख यांनी दम सोडला आणि त्यांचा प्लॅन फसला असे ते म्हणाले.

# बीडमधील बड्या नेत्याने माझ्याविरुध्द षडयंत्र रचले

## आ.सुरेश धस यांचा आरोप; फडणवीसांकडे तक्रार करणार

मुंबई । प्रतिनिधी

गेल्या चार दिवसापासून बीडमधील एका बड्या नेत्याने माझ्याविरोधात जाणिवपुर्वक षडयंत्र रचले असल्याचा आरोप आ. सुरेश धस यांनी पत्रकार परिषदेत केला. तसेच या नेत्याचे नाव आणि त्याने काय षडयंत्र रचले हे सर्व मी बीडमध्ये पत्रकार परिषद घेऊन सांगणार असल्याचे सांगून त्या बड्या



त्यामुळे गेल्या दोन महिन्यापासून धस हे प्रसार माध्यमं आणि जनतेच्या ओठावर होते. मराठा समाज पान २ वर

### धसांचा इशारा नेमका कोणाकडे?

आपल्या विरोधात गेल्या चार दिवसात षडयंत्र करण्यात आले. तो नेता बीडचा असून त्या बड्या नेत्याची मुख्यमंत्र्यांकडे तक्रार करणार असल्याचे आ. सुरेश धसांनी सांगितले आहे. त्यामुळे तो बडा नेता कोण?, त्यांचा इशारा नेमका कोणाकडे? याविषयी तर्कवितर्क लावण्यात येत आहे. धसांचा इशारा हा पंकजा मुंडे, पंडीत की आणखी दुसऱ्या कोणाकडे आहे, हे सध्या तरी गुलदस्त्यात आहे.

# बीडचे पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्याकडून १५० आरोपींना समज

## दुसऱ्यांदा गुन्हा केल्यास कडक कारवाईचा इशारा

बीड । पतिनिधी

बीडचे पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत पुन्हा ॲक्शन मोडवर आल्याचे पहावयास मिळाले आहे. हत्येचा प्रयत्न करणाऱ्या जिल्ह्यातील तब्बल दीडशे आरोपींना तंबी देण्यात आली आहे. सर्वच आरोपींना पोलिस अधीक्षक कार्यालयात मंगळवारी (१८ फेब्रुवारी) बोलाविण्यात आले होते. यावेळी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी दुसऱ्यांदा गुन्हे करू नका, अन्यथा कडक कारवाईला सामोरे जावे लागेल, अशी समज दिली.

आधी वाळू माफिया, त्यानंतर कुख्यात गुन्हेगारांना तंबी देण्यात आल्यानंतर कॉवत यांनी कलम ३०७ म्हणजेच हत्येचा प्रयत्न करणाऱ्या आरोपींना समज दिली आहे. जिल्ह्यातील गुन्हेगारी रोखण्यासाठी पान २ वर



# सहावा राज्य वित्त आयोग स्थापनेस मान्यता

## मंत्रीमंडळ बैठकीत निर्णय

मुंबई । प्रतिनिधी

राज्य मंत्रिमंडळ बैठकीत मंगळवारी ६ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. त्यात अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्ससाठी (एएनटीएफ) एकूण ३४६ नवीन पदे निर्माण करण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. त्यासाठी २२.३७ कोटी रुपये इतका निधी खर्च केला जाणार आहे. तसेच राज्य मंत्रिमंडळाने सहावा राज्य वित्त आयोग स्थापन करण्यासही मान्यता दिली आहे.

१) कृष्णा–कोयना उपसा सिंचन योजनेतील म्हैसाळ उपसा सिंचन योजनेसाठी सौर ऊर्जा प्रकल्प पान २ वर

# पंकजाताई मुंडे त्रिपुराच्या दौऱ्यावर; बांबू हस्तकला प्रदर्शनाला दिली भेट

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या हवामान व भौगोलिक परिस्थितीचा विचार करून तसेच शास्त्रीय दृष्टीची सांगड घालून महाराष्ट्र राज्यात बांबू मिशन अमलबजावणीचा निर्णय घेऊन तो प्रभावीपणे राबवू असं राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी म्हटले आहे.



पंकजाताई मुंडे त्रिपुरा राज्याच्या दौऱ्यावर असून मंगळवारी सकाळी त्यांचे आगरताळा विमानतळावर भाजपा पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१८ फेब्रुवारी २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ४७.०० क्विंटल | २,४६० | ३,३८२ | ३,००० |
| ज्वारी/हायब्रिड :११३.०० क्विंटल | ३,४५० | १,९०० | २,३८१ |
| मका/लोकल:५.०० क्विंटल | २,२०१ | २,२०१ | २,२०१ |
| तूर : ४३.५० क्विंटल | ६,५०० | ७,५०० | ७,१७६ |
| उडीद : ०.५० क्विंटल | ६,००१ | ६,००१ | ६,००१ |
| बाजरी: २,१५० क्विंटल | २,८०१ | २,५९८ | २,५५८ |
| मुग : ०.५० क्विंटल | ७,१०० | ७,१०० | ७,१०० |
| सोयाबीन: ९८.०० क्विंटल | ३,९५० | ४,०५१ | ४,००६ |
| हरभरा: २९.५० क्विंटल | ५,५०० | ९,००१ | ७,०३३ |

# बीडकरांसाठी आज शिवजयंतीनिमित्त सांस्कृतिक मेजवाणी

## न भुतो न भविष्यती शिवजयंती साजरी होणार–अध्यक्ष सतेंद्र पाटील



बीड । प्रतिनिधी

दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती, बीड शहर (चंपावती नगरी) च्या माध्यमातून आगळ्यावेगळ्या स्वरूपात शिवजयंती साजरी करण्यासाठी आयोजन करण्यात आले आहे. सांस्कृतिक कार्यक्रमांनी याहीवर्षी शिवजयंती साजरी होणार आहे. बीडकरांसाठी आज शिवजयंती सोहळ्यात सांस्कृतिक मेजवाणी असणार असून हा शिवजयंती सोहळा न भुतो ना भविष्यती असा होणार असल्याची माहिती सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती २०२५ चे अध्यक्ष प्रा. सत्येंद्र पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन उत्सव समितीने केले आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून अखंडितपणे बीड शहरात आ.संदीप क्षीरसागरांच्या पुढाकारातून आणि मार्गदर्शनातून भव्य दिव्य आणि आगळ्यावेगळ्या स्वरूपात शिवजयंती साजरी केली जात आहे. वेगवेगळे सांस्कृतिक कार्यक्रम, नृत्य आणि क्रीडा कार्यक्रमांच्या माध्यमातून गेली अनेक वर्षे शिवजयंती साजरी होत आली आहे. दरवर्षी प्रमाणे बीडच्या सांस्कृतिक परंपरेनुसार सार्वजनिक पान २ वर

### सांस्कृतिक कार्यक्रमांची प्रमुख आकर्षणे

तब्बल ४५० ढोलताशांचे करवीर नाद नावाचे सुप्रसिद्ध असलेल्या ढोलताशा पथकाचे सादरीकरण, तिबेटियन मॉंक अर्थात तिबेट देशातील धर्मगुरूंचे जगप्रसिद्ध असलेले शाओलीन मार्शल आर्ट, पश्चिम बंगाल येथील रायबिशी आर्ट स्कूल नावाचे पथक ॲक्रोबाईक्स आणि वेगवेगळे चित्त थरारक प्रात्यक्षिके सादर करणार आहे, ओडिशा राज्यातील दुलदुली बाजा नावाचे आदिवासी वाद्य पथक आपली कला सादर करणार आहे, आंतरराष्ट्रीय दर्जाचा लाईट आणि लेजर शो आदि कार्यक्रम होणार आहेत.




## अग्रलेख

# दादांची हतबलता की निष्क्रीयता...!


उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी अन्न पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याचा विषय त्यांच्या स्वाधीन करून या प्रकरणात आपण हतबल आहोत, हे दाखवून दिले आहे. एकेकाळी स्पष्टवक्तेपणा आणि कठोर निर्णय घेण्याच्या क्षमतेसाठी प्रसिद्ध असलेले अजित पवार आता स्वत: पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष असूनही आपल्या एका मंत्र्याला राजीनामा देण्यास भाग पाडू शकत नाहीत, हे आश्चर्यकारक आहे. कधीकाळी त्यांनी अनेक सहकाऱ्यांना कठोर निर्णयांमुळे अडचणीत आणले होते. आर.आर. पाटील, छगन भुजबळ, जयंत पाटील आणि विजयसिंह मोहिते पाटील यांसारख्या नेत्यांना त्यांच्या स्पष्टवक्तेपणाचा फटका बसला होता. मग तेच दादा धनंजय मुंडे यांच्या बाबतीत एवढे नरम कसे?

बीडच्या घटनेमुळे महाराष्ट्राची संपूर्ण देशभर नाचक्की झाली आहे. एका सत्ताधारी पक्षाच्या सरपंचाची निर्घृण हत्या झाली आणि त्यावरून मोठे राजकीय वादळ उठले. बीडमधील सत्ता आणि मत्तेचे बेमुर्वतखोर राजकारण उघडकीस आले. तिथली लूट उघडकीस आली. गुन्हेगारी स्वरूपाचा कारभार उघड झाला. राज्यभर दोन जातीत तेढ निर्माण झाला. खून, खंडणी, ठेकेदारी आणि प्रशासनातील जातीयवाद अशी अनेक गंभीर प्रकरणे उघडकीस आली. सत्ताधाऱ्यांची यात पुरती नाचक्की झाली. एवढ्या गंभीर प्रकरणावर अजित पवार शांत आहेत. त्यांच्या मंत्रिमंडळातील मंत्र्यावर एवढ्या मोठ्या आरोपांचे सावट असताना ते गप्प का? त्यांच्या स्वत:च्या राजकीय कारकिर्दीत त्यांना चुकीच्या निर्णयांसाठी जबाबदार धरले गेले आहे, मग यावेळी ते कोणत्या दबावामुळे धनंजय मुंडे यांना संरक्षण देत आहेत? भाजपचे नेते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे विरोधी पक्षनेते असताना अनेक मंत्र्यांच्या राजीनाम्यांसाठी आक्रमक भूमिका घेत. भ्रष्टाचार, नैतिक मुद्दे किंवा अन्य कोणत्याही कारणावरून त्यांनी विरोधी पक्षातीलच नव्हे, तर आपल्या पक्षातीलही नेत्यांना हटवले. मग आता, जेव्हा त्यांच्या मंत्रिमंडळातीलच एका मंत्र्याला इतक्या मोठ्या वादळाला तोंड द्यावे लागत आहे, तेव्हा त्याला बाहेरचा रस्ता दाखवण्यात त्यांना अडचण का येते आहे? सरपंच देशमुख यांच्या हत्येप्रकरणी भाजपच्या स्थानिक नेत्यांनीच धनंजय मुंडे यांच्यावर गंभीर आरोप केले. एवढेच नव्हे, तर या प्रकरणात भाजप आमदार सुरेश धस यांनी मध्यस्थी केल्याचेही समोर आले. पक्षाच्या कार्यकर्त्याची हत्या होऊनही भाजपने या प्रकरणात कठोर भूमिका घेतली नाही, ही बाब लक्षवेधी आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष देखील या विषयावर मौन बाळगून आहेत. त्यामुळे या प्रकरणात पक्षाने कोणत्या बाजूने भूमिका घेतली आहे, हे स्पष्ट होत नाही. महाराष्ट्रातील जनतेला नेत्यांची अशी वागणूक किती दिवस सहन करावी लागणार? जनता एवढ्या मोठ्या घडामोडींवर गप्प का आहे? या प्रकरणात स्पष्टपणे काहीही घडताना दिसत नाही, आणि त्यामुळे लोकांच्या मनात सरकारच्या निक्रियतेबद्दल प्रश्न निर्माण होऊ लागले आहेत. कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊनही सरकार योग्य ती पावले उचलत नाही, ही गंभीर बाब आहे. सत्ताधारी पक्षात दबावाचे राजकारण खेळले जात असल्याची शक्यता नाकारता येत नाही. धनंजय मुंडे यांना वाचवण्यासाठी पक्षाने माघार घेतली आहे का? अजित पवार यांना हे प्रकरण हाताळण्यात कोणती अडचण येते आहे? या प्रश्नांची उत्तरे अद्याप समोर आलेली नाहीत. याशिवाय, विरोधकांनीही या प्रकरणात प्रभावी भूमिका घेतलेली दिसत नाही. मागील काळात विरोधी पक्ष अशा प्रकरणांवर आक्रमक असायचा, मात्र यावेळी त्यांनी फारसा आवाज उठवलेला नाही. त्यामुळे त्यांनाही या प्रकरणाला पुढे न्यायचे नाही का, असा प्रश्न उपस्थित होतो. विरोधकांनी संपूर्ण ताकद लावून सरकारला जाब विचारला पाहिजे, पण तशी परिस्थिती दिसत नाही.

एकूणच धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याच्या प्रश्नावर अजित पवार यांनी घेतलेली भूमिका, भाजपच्या नेत्यांनी दाखवलेली संमिश्र प्रतिक्रिया आणि विरोधकांचा कमी झालेला आक्रमकपणा हे सर्व पाहता, या प्रकरणात एक वेगळेच राजकारण सुरू असल्याचे स्पष्ट होते. महाराष्ट्रातील जनता हे राजकारण समजून आहे. मात्र, हे प्रकरण कुठपर्यंत जाते आणि त्याचा पुढील राजकीय समीकरणांवर काय परिणाम होतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. गत अधिवेशनात सुरेश धस यांनी सभागृहात ज्या पद्धतीने घटना पट मांडला त्यामुळे महाराष्ट्र कळवळला. त्या कृत्यांच्या कहाण्या ऐकताना लोकांच्या अंगावर शहारे आले. महाराष्ट्र ढवळून निघाला. त्यानंतर राजकारणी जे वागत आहेत त्यातून घृणा निर्माण होत आहे. महादेव मुंडे हत्या प्रकरणाचा तपास सुरू झाल्यानंतर ही मिटवामिटवी सुरू झाली का? आणि आपल्या हाती काही महत्त्वाचे लागले असे समजून अजित दादांनी धनंजय मुंडेंवर निर्णय सोपवले का? हे लवकरच समजेल. पण ज्या पद्धतीचे राजकारण सुरू आहे ते काही बरे नव्हे.

## वाळू उपसा करणारे पाच हायवा दोन जीसीबी जप्त

### आयपीएस सिद्धार्थ बारवाल यांची धडाकेबाज कारवाई



**जालना । प्रतिनिधी**

**आयपीएस सिद्धार्थ बारवाल यांनी मध्यरात्री वेशांतर करून वाळू माफ यावर धडाकेबाज कारवाई केली अशी कारवाई अंबड पोलीस स्टेशनचे पोलीस प्रशासन कारवाई का करू शकत नव्हते अशी उलट सुलट चर्चा सुरू आहे अंबड पोलीस स्टेशन हद्दीत रात्री दिवसा कुठे काय चालतं हे सर्व पोलिसांना माहित आहे पण अशी कारवाई नवीन आयपीएस अधिकाऱ्याला काय करावा लागत आहे अशी पण चर्चा जिल्ह्यामध्ये सुरू आहे. तसेच या कारवाई संदर्भात काही पोलिसांच्या लोकेशन मुळे कारवाई करण्यास अडचण निर्माण होत असल्याचे बोलल्या जात आहे. यामुळे आयपीएस अधिकारीला ही वाळू माफयावर गोपनीय पद्धतीने कारवाई करावा लागले. श्री सिद्धार्थ बारवाल हे स्वतः व पोलीस प्रशासनाला सोबत घेऊन काही ना सांगता गोपनीय पद्धतीने नदीपात्र गाठत वाळूमाफियाविरुद्ध धडाकेबाज कारवाई केली.**

दुधना पात्रातून अवैधरित्या वाळू तस्करी करणाऱ्या पाच हायवासह दोन जेसीबी पकडल्या वाहनांसह सुमारे अडीच कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला व पाच वाळूतस्करांना ताब्यात घेण्यात आले. अंबड तालुक्यातील मठपिंपळगाव शिवारातून जाणाऱ्या दुधना नदीच्या पात्रातून अवैधरित्या वाळू उत्खनन करून बेसुमार वाळू उपसा केल्या जात होता सदरी वाळू उपसा अनेक वर्षापासून सुरू आहे परंतु या भागातील मंडळाधिकारी तलाठी पोलीस प्रशासन यांना माहिती असून सुद्धा कारवाई का करण्यात येत नव्हती यासंदर्भात कारवाई का करण्यात येत नव्हती असा पण प्रश्न उपस्थित होतो. याबाबत खाजगी व्यक्तीकडून गोपनीय माहिती मिळताच अंबड पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी आयपीएस सिद्धार्थ बारवाल यांनी मध्यरात्री वेशांतर करून एका हायवा वाहनातूनच दुधना नदीचे पात्र गाठले. त्यामुळे नदीत वाळू उपसा करणाऱ्या वाळू तस्करांना आणि जेसीबी, हायवाचालकांना पोलीस आल्याची साधी कुणकुण देखील लागली नाही. मात्र, आयपीएस श्री. बारवाल हे हायवातून खाली उतरताच त्यांच्यासोबत असलेल्या साध्या गणवेशातील पोलिसांनी वाळू उपसा करणाऱ्या हायवा, जेसीबी वाहने आणि चालकांना गराडा घातला. त्यामुळे त्याठिकाणी असलेले वाहने आणि चालकांना पलायन करता आले नाही. यावेळी आयपीएस श्री. बारवाल यांनी वाळू उत्खनन करणारे दोन जेसीबी आणि पाच हायवा वाहने जागेवरच ताब्यात घेतली.ही हायवा वाहने धरपकडीची मध्यरात्री एक वाजता सुरू झालेली मोहीम आज सकाळी ६ वाजेपर्यंत सुरू होती. या धडाकेबाज कारवाईत पाच वाळूतस्करांना ताब्यात घेण्यात आले असून, सुमारे २ कोटी ३५ लाखाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आयपीएस श्री. सिद्धार्थ बारवाल यांनी पोलीस पथक सोबत घेऊन धडाकेबाज कारवाई केली.

## पाणी पुरवठ्याच्या कामात पैसे मागतांना अधिकारी कर्मचारीना लाजा कशा वाटत नाही-आ. खोतकर

**जालना । प्रतिनिधी**

**आता जिल्ह्यामध्ये पाणी टंचाई सुरू होत असून, त्यापुर्वीच अधिकारी कर्मचारी योजना चे काम सुरू करण्यासाठी व काम पूर्ण करण्यासाठी जल जीवन मिशन अंतर्गत मंजूर कामे पूर्ण करणे व अपेक्षित आहे या कामासाठी काही अधिकारी कर्मचारी पैशाची मागणी करतात अशा अधिकाऱ्यांना लाज कसे वाटत नाही तुम्हाला कुठेतरी हे पाप फेडावा लागेल.**



सध्या जालना जिल्ह्यामध्ये जलजिवन मिशन अंतर्गत मंजूर कामे पुर्ण होणे आवश्यक आहे. मात्र, या कामासाठी काही अधिकारी पैसे मागत असल्याच्या तक्रारी सरपंचांन जिल्हा परिषद च्या एक बैठक मध्ये केल्या असता त्याची दखल घेत आ. अर्जुनराव खोतकर यांनी घेतली व हे चांगलेच कडाडले. जे कोणी अधिकारी कर्मचारी असतील ते कुठे फडणारहे हे पाप, असा प्रश्न उपस्थित केला . जे कोणी अधिकारी असे पैसे मागत असतील त्यांना सरळ लाचलूचपत विभागाच्या ताब्यात द्या, अशी सरपचांना सूचना केल्या. सरपंचांनी कोणताही विचार न करता सरळ अशा अधिकारी कर्मचाऱ्यांना लाच प्रतिबंधक विभागाच्या ताब्यात द्यावा. जालना विधानसभा क्षेत्रातील आणि घनसावंगी तालुक्यात समाविष्ठ असलेल्या गावांची संभाव्य पाणी पुरवठा टंचाईची आढावा बैठक जिल्हा परिषदेच्या कै. यशवंतराव चव्हाण सभागृहात पार पडली. यावेळी अनेक गावच्या सरपंचांनी संभाव्य पाणी . टंचाई आणि उपा-योजना याबाबत मत मांडले. प्रामुख्याने ग्रामीण भागत टंचाईच्या दृष्टीने जलजिवन मिशन अंतर्गत अनेक कामे मंजुर करण्यात आलेली आहे. मात्र, ही कामे पुर्ण झालेली नसल्याने अनेकांना टंचाईचा समाना करावा लागणार आहे. त्या दृष्टीकोणातुन टंचाईच्या उपा-योजनांबाबत कुठलिही कुचराई खपवुन घेणार नसल्याचे निर्देश यावेळी आ. खोतकर यांनी दिले. अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे पाणी पुरवठ्याची कामे रखडल्याची तक्रारी माझ्यापर्यंत आल्या नाही पाहिजे असा इशारा आ. खोतकर यांनी अधिकारी कर्मचारी यांना खडसावले. इतकेच नाही तर जे कोणी अधिकारी तुम्हाला पैसे मागत असतील त्यांची गय करु नका आणि त्यांना सरळ लाचलूचपत विभागाच्या ताब्यात द्या, असे आ. खोतकर यांनी सुचविले. याप्रसंगी आ. हिकमत उढाण . शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रामुख्याने आजच्या बैठकीत उपाय-योजनांची प्रशासनाने गंभीर दखल घ्यावी आणि त्याची पारदर्शकपणे अंमलबजावणी करावी, अशा सुचनाही आ. खोतकर यांनी या बैठकीत कर्मचारी अधिकाऱ्यांना यावेळी दिल्या.

## श्रीसंत भगवानबाबा सामाजिक प्रतिष्ठान'वर गुरुवारपासून सर्वधर्म समभाव अखंड हरिनाम सप्ताह

बीड । प्रतिनिधी



येथील 'श्रीसंत भगवानबाबा सामाजिक प्रतिष्ठान'वर प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी सर्वधर्म समभाव राष्ट्रीय एकात्मता अखंड हरिनाम सप्ताह दि.२० फेब्रुवारी ते २७ फेब्रुवारी २०२५ दरम्यान आयोजित करण्यात आला आहे. सप्ताहाच्या पहिल्या दिवशी दि.२० रोजी ह.भ.प. बलभीम महाराज राऊत आणि मोहन महाराज खरमाटे यांचे प्रवचन तर रात्री ६.३० ते ८.३० वाजता महंत गणेश महाराज बडे, दुर्गाशक्ती गड, यांचे कीर्तन होणार आहे.

दि.२१ रोजी ह.भ.प. माधव महाराज डाके, ज्ञानेश्वर तत्वचिंतक बीड यांचे प्रवचन तर सायंकाळी ६.३० ते ८.३० ह.भ.प. महादेव महाराज चाकरवाडीकर यांचे कीर्तन, दि. २२ रोजी ह.भ.प. बाबूराव महाराज मुंडे यांचे प्रवचन, तर ह.भ.प. भागवताचार्य कृष्णानंद महाराज मुंडे, खडकी यांचे कीर्तन, दि. २३ रोजी ह.भ.प. प्राचार्य परशुराम महाराज मराडे सर यांचे प्रवचन तर स्वररत्न भागवताचार्य तथा रामायणाचार्य ह.भ.प. अंजलीताई केंद्रे, उदगीर यांचे कीर्तन, दि.२४ रोजी ह भ प डॉक्टर भागवत मोटे व ह.भ.प. उषाताई मुंडे महाराज यांचे प्रवचन तर सायंकाळी ह.भ. प.पांडुरंग महाराज जाधव गुरुजी, सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी बीड यांचे कीर्तन होणार आहे. दि.२५ रोजी ह भ प श्रीमंत महाराज तांदळे व ह.भ.प. बद्रीनाथ महाराज, नाथ जोगी यांचे प्रवचन तर ह.भ.प.नवनाथ महाराज शास्त्री, मठाधिपती श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ संस्थान भालगाव यांचे कीर्तन, दि.२६ रोजी ह भ प महामंडलेश्वर स्वामी शिवरुद्र आनंद महाराज, काशी व श्रीसंत भगवानबाबा प्रतिष्ठान, बीड यांचे प्रवचन तर सायंकाळी ६.३० ते ८.३० इंदुवासिनी गडाचे महंत महामंडलेश्वर स्वामी १००८ त्रिवेंआनंद सरस्वतीजी महाराज यांचे कीर्तन होणार आहे. गुरुवार दि.२७ रोजी सकाळी ११.०० ते १.०० दरम्यान ह.भ.प. कुटचिंतन प्रवक्ते महादेव महाराज राऊत, म्हाळस जवळेकर यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. कीर्तनानंतर निमंत्रित मान्यवरांचा सत्कार आणि त्यानंतर महाप्रसादाने कीर्तनाची सांगता होणार आहे. सप्ताहातील कीर्तन, प्रवचन व सर्व कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीसंत भगवानबाबा सामाजिक प्रतिष्ठान सप्ताह समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# शिवजन्मोत्सवानिमित्त आयोजित शिवशाही महानाट्याचा लाभ शिवप्रेमींनी घ्यावा-आ.विजयसिंह पंडित

**गेवराई । प्रतिनिधी**

**छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन कार्यावर आधारित शिवशाही या ऐतिहासिक महानाट्याचे तीन प्रयोग शिवजन्मोत्सवानिमित्त आयोजित केले असुन शिवप्रेमी नागरीकांनी त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले आहे. शिवजन्मोत्सवानिमित्त आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी सुप्रसिद्ध सिने अभिनेत्री अलका कुबल, शंतनु मोघे, महानाट्याचे दिगदर्शक महेंद्र महाडिक यांच्यासह राष्ट्रवादी सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.**



राष्ट्रवादी सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा समितीच्या वतीने बुधवार दि. १९ ते २१ फेब्रुवारी दररोज सायंकाळी ७ वा. र.भ. अट्टल महाविद्यालयाच्या मैदानावर शिवनगरी येथे शिवशाही या ऐतिहासिक महानाट्याचे विनामुल्य आयोजन करण्यात आले आहे. शुभारंभाचा पहिला प्रयोग सर्वांसाठी असुन गुरुवार दि. २० रोजीचा प्रयोग केवळ महिलांसाठी आणि शुक्रवार दि. २१ रोजीचा प्रयोग शालेय विद्यार्थ्यांसाठी आयोजित केला आहे. या संदर्भात समितीच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत संस्थापक अध्यक्ष आ. विजयसिंह पंडित यांनी सविस्तर माहिती दिली. शिवशाही महानाट्याच्या रंगमंचावर झालेल्या पत्रकार परिषदेला सिने अभिनेत्री अलका कुबल, अभिनेते शंतनु मोघे, दिगदर्शक महेंद्र महाडिक, सिने अभिनेते प्रकाश धोत्रे, महेश कोकाटे, रमेश रोकडे, डॉ. राजेश आहेर, समितीचे अध्यक्ष शैलेश तोष्णीवाल, कार्याध्यक्ष संदिप मडके, सभापती मुजीब पठाण आणि युवानेते रणविर पंडित यांच्यासह समितीचे पदाधिकारी, पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. पाच मजली किल्ल्याची हुबेहुब प्रतिकृती, शोभीवंत सिंहासन मेघडंबरी, जहाजाचा वापर करुन महाराजांच्या कोकण मोहिमेचा जिवंत देखावा, भव्य राज्याभिषेक सोहळा, शिवकालीन शस्त्रास्त्रे व युद्ध साहित्य यासह अधुनिक ध्वनी व प्रकाश योजना, घोडे, बैलगाडी, पालखी, नेत्रदिपक अतिषबाजी यांचा वापर करुन मराठा व पातशाही यांच्या तलवारींचा खणखणाट, तोफांचा गडगडाट, अग्नीबाणांचा वर्षाव असा घनघोर रणसंग्राम याच देही पाहण्याचे सौभाग्य गेवराईकर शिवप्रेमींना लाभणार असल्याचे आ. विजयसिंह पंडित यांनी यावेळी सांगितले. पुढे बोलतांना ते म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त डिजेच्या तालावर थिरकनारी मद्यधुंद तरुणाई या माध्यमातुन निर्माण झालेल्या अनिष्ट परंपरा मोडित काढुन खर्या अर्थाने जयंतीचे शिवजन्मोत्सवात रुपांतर करण्याचे काम या माध्यमातुन आम्ही करत आलो आहोत असे आ. पंडित यांनी यावेळी सांगितले. सिने अभिनेत्री अलका कुबल यांनी आ. विजयसिंह पंडित यांच्या कार्याचे कौतुक करुन गेवराई सारख्या ग्रामीण भागातील प्रेक्षकांना या ऐतिहासिक महानाट्याची पर्वणी उपलब्ध करुन दिल्या बद्दल आभार मानले. राजकीय नेते निवडणुक जिंकण्यासाठी असे कार्यक्रम आयोजित करतात मात्र आ. पंडित यांनी निवडुन आल्यानंतर सुद्धा अशा महानाट्याचे आयोजन करणारा आ. विजयसिंह पंडित यांच्यासारखा एकमेव नेता आम्ही पाहिला असल्याचे गौरवोद्गार महानाट्याचे दिगदर्शन महेंद्र महाडिक यांनी काढले. गेवराईच्या मातीतील कलावंताना महानाट्यात काम करण्याची संधी दिल्या बद्दल आ. पंडित यांनी त्यांचे आभार मानले. या महानाट्याचा लाभ सर्व शिवप्रेमी नागरीकांनी घेण्याचे आवाहन या निमित्ताने आ. पंडित यांनी केले.

### बाजारतळ येथे होणार अभिवादन सोहळा

राष्ट्रवादी सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा समिती व नगर परिषद, गेवराई यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दि. १९ फेब्रुवारी रोजी सकाळी १०:३० वा. गेवराई शहरातील बाजार तळ येथे छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यात येणार आहे. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज बाल उद्यानाचे लोकार्पण या निमित्ताने भवानी अर्बन बँकेचे अध्यक्ष बप्पासाहेब मोटे यांच्या शुभहस्ते तर आ. विजयसिंह पंडित यांच्या प्रमुख उपस्थित होणार आहे. या प्रसंगी शिवप्रेमी नागरीकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले.

## पान १वरून...

### महाकुंभवर मुख्यमंत्री ममता

मृत्युकुंभ म्हटले. आपण महाकुंभाचा आदर करत असल्याचेही त्यांनी सांगितले. ममता बॅनर्जी म्हणाल्या की, हा मृत्युकुंभ आहे. मी महाकुंभाचा आदर करते, मी पवित्र गंगा मातेचा आदर करते. पण यासाठी कोणतीही योजना नाही, किती मृतदेह बाहेर काढले आहेत? श्रीमंत आणि व्हीआयपी लोकांना १ लाख रुपयांपर्यंतच्या कॅम्प्सची सुविधा देण्याची तरतूद आहे. कुंभमेळ्यात गरिबांसाठी कोणतीही व्यवस्था नाही. जत्रेत चेंगराचेंगरीची परिस्थिती सामान्य आहे, त्यासाठी व्यवस्था करणे आवश्यक आहे. यासाठी तुम्ही कोणत नियोजन केले आहे, असे त्या म्हणाल्या.

-------------

### केंद्राची परवानगी तरीही

तूर खरेदीला परवानगी दिली तरी राज्ये मात्र त्याची अंमलबाजावणी करतान दिसत नाही. केंद्र सरकारने कडधान्य उत्पादनात आत्मनिर्भर होण्यासाठी देशांतर्गत उत्पादन वाढविण्याचे उद्दीष्ठ ठेवले आहे. त्यासाठी सरकारने एकात्मिक पंतप्रधान अन्नदाता आय संरक्षण अभियान अर्थात पीएम-आशा अभियान सुरु करण्यात आले. या अभियातून कडधान्य, तेलबिया आणि खोबऱ्याची हमीभावाने खरेदी करण्यात येणार आहे. या अभियानाला केंद्राने २०२५-२६ पर्यंत मुदतवाढ दिली. तसेच कडधान्य उत्पादनात आत्मनिर्भर होण्यासाठी किंमत समर्थन योजनेतून राज्यांना १०० टक्के तूर, उडीद आणि मसूर खरेदीला परवानगी दिली आहे. नाफेड आणि एनसीसीएफमार्फत पुढील चार वर्षे खरेदी करण्याला अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी अर्थसंकल्पात मंजुरी दिली. अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पात १०० टक्के तूर, उडीद आणि मसूर खरेदीला मान्यता दिल्यानंतर केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, छत्तीसगड, गुजरात, हरियाना, कर्नाटक, मध्य प्रदेश, तेलंगणा आणि उत्तर प्रदेश या ९ राज्यांमध्ये तूर खरेदीला मंजूरी दिली. वास्तविक पाहता केंद्र सरकारच्या अभियातून शेतकऱ्यांची संपूर्ण तूर खरेदी होणे आवश्यक आहे. मात्र या ९ राज्यांनी केवळ १३ लाख २२ हजार टन खरेदीचे उद्दीष्ट ठेवले.

-------------

### न्यायासाठी वेळप्रसंगी

चार दिवसापुर्वी आ. सुरेश धस आणि मंत्री धनंजय मुंडे यांची भेट झाल्याचे समोर आल्यावर फ्रंटला असलेले सुरेश धस हे आता मागे पडले आहेत. त्यातच अचानकपणे सुप्रिया सुळे यांनी मस्साजोग व परळी येथे जाऊन पिडीत कुटुंबाला भेटण्याचे जाहीर केल्याने धस यांच्याऐवजी आता सुप्रिया सुळेच या दोन्ही खून प्रकरणाच्या लढ्याचे नेतृत्व करणार असल्याचे दिसत होते. शेवटी मंगळवारी त्यांनी मस्साजोग येथे जाऊन देशमुख कुटुंबाचे अश्रु पुसण्याचे काम केले. यावेळी देशमुख कुटुंबाने आपली कैफियत त्यांच्या समोर मांडली. सुप्रिया सुळे यांच्यासोबत खा. बजरंग सोनवणे, आ. जितेंद्र आव्हाड, आ. संदिप क्षीरसागर, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के आदि उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या, जोपर्यंत न्याय मिळत नाही तोपर्यंत मी शांत बसणार नाही. असे प्रकार पुन्हा होता कामा नये. महिलांनी आता हातात लाठणं घेण्याची वेळ आली असून अशा लोकांना वेळीच ठेचून काढले पाहिजे अशा त्या म्हणाल्या. तसेच देशमुख कुटुंबिय आणि ग्रामस्थांनी अन्नत्याग करु नये, आपण लोकशाही मार्गाने आंदोलन करीत न्यायासाठी लढणार आहोत. वेळ प्रसंगी मी अन्नत्याग करेन पण मागे हटणार नाही, अशा त्या म्हणाल्या. एकंदरीत मुंडे-धस भेटीनंतर देशमुख खून प्रकरणाच्या लढ्यात आता सुप्रिया सुळे यांची एन्ट्री झाल्याचे दिसून येत आहे. तसेच सुप्रिया सुळे यांनी परळीत जावून महादेव मुंडे यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन सांत्वन केले. यावेळी त्यांनी पोलिस अधिक्षकांशी फोनवर संपर्क करीत या प्रकरणाचा तपास करण्याची विनंती केली.

**ड्युटीवर असलेल्या सर्वच पोलिसांना फाशी द्या-ग्रामस्थ**

संतोष देशमुख यांचा खून झाला त्या दिवशी केज पोलिस ठाण्यात जे अधिकारी व पोलिस कर्मचारी ड्युटीवर होते, ते सर्वजण दोषी असून त्यांना फाशी द्या, अशी मागणी मस्साजोग ग्रामस्थांनी खा. सुप्रिया सुळे यांच्या समोर शासनाकडे केली. डिवायएसपी, पीआय महाजन, पोलिस उपनिरीक्षक पाटील यांच्यासह सर्व अधिकारी व पोलिसांचे सीडीआर तपासले तर हे सर्वच दोषी आढळून येतील. त्यामुळे त्यांना फाशी द्या अशी मागणी यावेळी ग्रामस्थांनी केली.

**कृष्णा आंधळे असा कसा सापडत नाही**

सुळे पुढे म्हणाल्या की, पहिला मुद्दा म्हणजे सर्व आरोपींना फाशीची शिक्षा झाली पाहिजे, याची सुनावणी 'फास्ट ट्रॅक' कोर्टाद्वारे झाली पाहिजे. ज्याने खंडणी मागितली किंवा ज्यांनी त्यांना मदत केली अशा सर्वांची चौकशी करून त्यांच्यामागे ईडी, सीबीआय लावले पाहिजे. सर्वांचे सीडीआर बाहेर आले पाहिजेत, महाराष्ट्रासमोर सत्य आले पाहिजे असेही सुळे यावेळी म्हणाल्या. फरार असलेले कृष्णा आंधळे सापडलेच पाहिजेत. माणूस असा कसा गायब होऊ शकतो असा सवाल देखील त्यांनी केला आहे.

-------------

### बीडचे पोलिस अधीक्षक

नवनीत कॉवत हे सगळ्याच प्रकारचे प्रयत्न करीत आहेत. जिल्ह्यातील सगळ्या ठाणे प्रमुखांना आदेश करीत कोणत्याही स्वरूपात गुन्हेगारी आणि अवैध धंदे खपवून घेतले जाणार नाहीत, अशी तंबी दिली आहे. ज्या भागात गुन्हा होईल त्याची सगळी जबाबदारी ही त्या ठाणे प्रमुखाची असणार आहे. याशिवाय जे पोलिस अधिकारी, कर्मचारी यांचा गुन्हेगाराशी संबंध दिसून येईल त्यांच्यावरही कारवाई करण्यात येणार आहे. अशा काही कर्मचाऱ्यांचीही परेड एसपी साहेबांनी घेतली असून त्यांनाही तशा सूचना कडक देण्यात आल्या आहेत.

-------------

### बीडमधील बड्या नेत्याने

धसांकडे आपला नेता म्हणून पाहत होता. त्यातच एका वृत्तवाहिनीने धनंजय मुंडे आणि सुरेश धस यांच्या भेटीची बातमी दाखवून खळबळ उडवून दिली. त्यानंतर चार दिवस याच विषयाभोवती सर्वकाही फिरत असाताना दिसत आहे. बीडमध्ये सुप्रिया सुळे यांनी देशमुख व मुंडे कुटुंबाची भेट घेतली. तर तिकडे मुंबईत पत्रकार परिषद घेऊन आ. सुरेश धस यांनी आपल्या विरोधात बीडच्या एका बड्या नेत्याने षडयंत्र रचले असल्याचा आरोप करीत याची तक्रार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करणार असल्याचे सांगितले. तसेच तो बडा नेता कोण? हे २० फेब्रुवारी रोजी आष्टी किंवा बीड येथे पत्रकार परिषद घेऊन सांगणार म्हटले आहे.

-------------

### पंकजाताई मुंडे त्रिपुराच्या दौऱ्यावर;

महिला मोर्चाच्या अध्यक्षा तसेच शासकीय वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वागत केले. राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ, पर्यावरण विभागाच्या प्रधान सचिव विनिता सिंघल यावेळी त्यांच्यासमवेत उपस्थित होत्या आगरताळा येथील बांबू लागवड प्रदर्शनाला भेट देऊन ना. पंकजाताई मुंडे यांनी महिलांच्या हस्तकला कौशल्याचे भरभरून कौतुक केले तसेच विविध जातीच्या बांबू लागवडीची यावेळी पाहणी केली. त्रिपुरातील बांबू हस्तकला देशातील सर्वोत्तम हस्तकलेपैकी एक आहे तसेच अगरबत्ती बनवण्यासाठी बांबूच्या काड्यांसाठी संपूर्ण देशाच्या गरजांपैकी बहुतांशी गरज या राज्यातून पूर्ण केली जाते. बांबू क्षेत्राच्या एकात्मिक विकासासाठी, पीपीपी फ्रेमवर्क अंतर्गत, २००७ मध्ये त्रिपुरा बांबू मिशन (टीबीएम) सुरू करण्यात आले होते त्रिपुरा बांबू हस्तकला त्यांच्या उत्कृष्ट डिझाइन, विस्तृत श्रेणीतील उत्पादनांसाठी आणि कलात्मक आकर्षणासाठी देशातील सर्वोत्तम मानल्या जातात. या प्रदर्शनात विविध जातीच्या बांबूच्या लागवडीचे आणि हस्तकला कौशल्याची पाहणी केल्यानंतर त्यांनी महाराष्ट्राच्या हवामान व भौगोलिक परिस्थितीचा विचार करून तसेच शास्त्रीय दृष्टीची सांगड घालून महाराष्ट्र राज्यात बांबू मिशनची अमलबजावणीचा निर्णय घेण्यात येईल असे सांगितले.

-----------

### सहावा राज्य वित्त

उभारण्यास तसेच योजनेची ऊर्जा कार्यक्षमता सुधारण्यासाठी १५९४.०९ कोटी रुपयांना प्रशासकीय मान्यता. या योजनेतून अवर्षण प्रवण भागात १,०८,१९७ हेक्टर क्षेत्राला लाभ. (जलसंपदा विभाग) २) अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्ससाठी (एएनटीएफ) एकूण ३४६ नवीन पदे निर्माण करण्यास मंजुरी, यासाठी २२.३७ कोटी रुपये इतका निधी खर्च करणार. (गृह विभाग) ३) सहावा राज्य वित्त आयोग स्थापन करण्यास मान्यता. (वित्त विभाग) ४) राज्यातील रोपवेची कामे राष्ट्रीय राज्यमार्ग लॉजिस्टीक व्यवस्थापन लि. (एनएचएलएमएल) मार्फत करण्यासाठी आवश्यक जागा उपलब्ध करुन देण्याचा निर्णय. (सार्वजनिक बांधकाम विभाग) ५) जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव तालुक्यातील वरखेडे लोंढे मध्यम प्रकल्पाला १२७५.७८ कोटींची सुधारित प्रशासकीय मान्यता. चाळीसगाव, भडगाव तालुक्यातील ८२९० हेक्टर क्षेत्राला सिंचन मिळणार. (जलसंपदा विभाग) ६) मौजे एरंडवणा, पुणे येथील दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलला जागा नाममात्र १ रुपयात शासकीय जमीन. (महसूल व वन विभाग).

---------

### बीडकरांसाठी आज शिवजयंतीनिमित्त

शिवजयंती उत्सव समिती, बीड शहर (चंपावती नगरी) च्या माध्यमातून दि.१९ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ७:०० वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शासकीय महापूजा आणि सायंकाळी ६:०० वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. तरी सर्व बीडकरांनी या शिवजयंती उत्सव सोहळ्यात सहभागी होऊन भव्य दिव्य शिवजन्मोत्सव सोहळ्याचे साक्षीदार व्हा, असे आवाहन सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती २०२५ चे अध्यक्ष प्रा. सत्येंद्र पाटील यांनी केले आहे. यावेळी पत्रकार परिषदेला सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती २०२५ चे अध्यक्ष प्रा.सत्येंद्र पाटील, मार्गदर्शक प्रा.विजय पवार, उपाध्यक्ष हाजी नसीम इनामदार व विष्णू वाघमारे, सचिव दिपक कर्नावट, कोषाध्यक्ष शिवाजी सानप, सहकोषाध्यक्ष सी.ए. संतोष आमटे व अशोक ठाकरे, सदस्य डॉ.प्रशांत गायकवाड, प्रा.कॅप्टन जगन्नाथ चव्हाण, अंकुश निर्मळ, प्रकाश वक्ते, प्रा.डॉ.रेखा ढेरे, डॉ.पुजा जाधव, सुमंत खांडे आदि उपस्थित होते.

-------------

cmyk

राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार, दि. १९ फेब्रुवारी २०२५



## घाटनांदुर अंगणवाडी विभागाच्या वतीने पालक मेळावा



**घाटनांदुर । प्रतिनिधी** अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदुर विभागातील अंगणवाडी सेविका ,मदतनीस यांच्या वतीने पालक मेळाव्याचे व विभागातील अंगणवाडी सेविका यांच्या वतीने वेगवेगळ्या उपक्रमातून स्टॉल लावून ०-३ वयोगटातील लहान बालकांचे स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते घाटनांदुर विभागाच्या पर्यवेक्षिका सी.एम कुंभार यांच्या अध्यक्षतेखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते . सुरुवातीचे क्षण मोलाचे पालक मेळाव्यामध्ये ०-३ अंगणवाडीतील लहान मुलांची आरोग्याची काळजी , आहाराची काळजी कशा पद्धतीने घेतली पाहिजे याची माहिती पालकांना सविस्तर देऊन या मेळाव्यामध्ये वेगवेगळ्या उपक्रमातून पालकांना मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी सी.एम.कुंभार ,सरपंच महेश गारठे, उपसरपंच शर्मिला जाधव, जाधव मॅडम, पत्रकार संजय रानभरे, परमेश्वर वैद्य, विश्वजीत गंडले ,दत्ता शिंपले व पालक व विभागातील सर्व अंगणवाडी सेविका, मदतनीस मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# गायरान जमिनी कसत असलेल्या अतिक्रमणधारी भूमीहीन शेतकरी, शेतमजूर यांच्या नावे सातबारा करा

## ऑल इंडिया किसान खेत मजदूर संगठन यांची मागणी; तहसीलदारांना निवेदन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**शासकीय / गायरान जमिनी कसत असलेल्या अतिक्रमणधारी गरजू भूमीहीन शेतकरी, शेतमजूर यांच्या नावे सातबारा किंवा पट्टा करा अशी मागणी ऑल इंडिया किसान खेत मजदूर संगठन यांनी तहसीलदार, अंबाजोगाई यांना शुक्रवार, दिनांक १४ फेब्रुवारी रोजी दिलेल्या निवेदनातून केली आहे.**




शेतकरी व शेतमजूरांची मोठी संघटना असलेल्या ऑल इंडिया किसान खेत मजदूर संगठन (ए.आय.के.के.एम.एस) चे महाराष्ट्र संघटक कॉम्रेड अनिलकुमार त्यागी यांच्या नेतृत्वाखाली तहसीलदार, अंबाजोगाई यांना शुक्रवार, दिनांक १४ फेब्रुवारी रोजी दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, आम्ही, शेतकरी व शेतमजूर यांची संघटना ऑल इंडिया किसान खेत मजदूर संगठन (ए.आय.के.के.एम.एस) या संघटनेतर्फे अंबाजोगाई तालुक्यात गरीब, गरजू भूमीहीन शेतकरी व शेतमजूरांची समस्यांचे निदान करणे हेतू आपल्या समोर मांडत आहोत. अंबाजोगाई तालुक्यात शेकडो किंवा हजारोंच्या संख्येत या गरजू भूमीहीन, शेतकरी व शेतमजूर १९८० च्या दशकापासून सतत आजतागायत जमिनी कसत आहेत, पीक घेत आहेत. ग्रामपंचायत यांनी सुध्दा या बाबत ठरावाच्या माध्यमातून ना हरकत दाखले दिलेले आहेत. या गरजू अतिक्रमणधारी शेतकरी / शेतमजूरांनी बहुतेक वेळा तालुका प्रशासनाबरोबर पत्र-व्यवहार ही केलेला आहे. परंतु, प्रशासनानी आपल्या स्तरावर पूर्ण प्रक्रिया आजपर्यंत पार पाडली नाही. परिणामी या गरजू शेतकरी / शेतमजूर आपल्या रोजगार हक्कांपासून वंचित राहिले. सदर शेतकरी / शेतमजूर यांच्या मनात रोष खदखदत आहे. ते निराशाला बळी पडत आहेत. लोकशाही राजवटीत हे अपेक्षीत नाही. आम्ही प्रशासनास मागणी करतो की, शासकीय / गायरान जमिनी कसत असलेल्या अतिक्रमणधारी / गरजू भूमीहीन शेतकरी / शेतमजूर यांचे नांवे सातबारा किंवा पट्टा शासन प्रशासनाद्वारे करण्यात यावे. जोपर्यंत ह्या ७/१२ किंवा पट्टा त्यांच्या नांवे होत नाही तोपर्यंत ह्या गरजू शेतकरी / शेतमजूर यांना बँक लोन, पीक विमा योजना व अन्य शासकीय सहाय्य सुविधा पण मिळत नाहीत. हे पण, शासन प्रशासनाने लक्षात घ्यावे. असे निवेदनात म्हटले आहे. सदरील निवेदनाची प्रत माहितीस्तव उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांना ही देण्यात आल्याचे निवेदनावर नमूद करण्यात आले आहे. सदरील निवेदनावर ऑल इंडिया किसान खेत मजदूर संगठन (ए.आय.के.के.एम.एस) चे महाराष्ट्र संघटक कॉम्रेड अनिलकुमार त्यागी, बलभीम हजारे, कालिदास हजारे, विजय इंगळे, त्रिंबक कांबळे, लिंबाजी पौळ, धनराज पौळ, उत्तरेश्वर गालफाडे, नागनाथ कांबळे, राजेंद्र कांबळे, गोपीनाथ कांबळे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. यावेळी अतिक्रमणधारी गरजू भूमीहीन शेतकरी / शेतमजूर यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## शिवजयंती निमित्त शिवरायांचा मावळा समीर शेख यांनी घरावर लावली भगवी पताका

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथील मावळा समीर बादशाह शेख आणि शेख कुटुंब यांनी शिवजयंती निमित्त त्यांच्या घरावर भगवी पताका लावून सर्व जनतेला आव्हान केले आहे की आपण दरवर्षी दिवाळी आणि रमजान ईद मोठ्या उत्साहात साजरी करतो आणि नवीन कपडे खरेदी करतो. त्याचप्रमाणे दरवर्षी शिवजयंतीनिमित्त सर्वांनी आपल्या घरावर भगवी पताका लावून घरासमोर रांगोळी काढून घरी गोड जेवण करायचे आहे. शिवजयंती हा मोठा सण साजरा करायचा आहे. शिवजयंती घराघरात साजरी करायची आहे समीर शेख हा वेगवेगळे सामाजिक उपक्रम घेऊन शिवरायांचे विचार गेल्या ११ वर्षांपासून लोकांपर्यंत पोहोचत



आहे. सर्वधर्मसमभाव चा संदेश देत आहे. सर्व धर्मातील लोकांना सोबत घेऊन जाणारे शेक कुटुंब गेले अकरा वर्षापासून घरी शिवजयंती साजरी करत आहे

## गोदावरी पब्लिक स्कूल व शंकरराव पाटील तौर प्राथमिक शाळा यांचे संयुक्तरित्या वार्षिक स्नेहसंमेलन

**घनसावंगी । प्रतिनिधी**

घनसावंगी तालुक्यातील कुंभार पिंपळगाव येथील सुर्योदय शिक्षण प्रसारक मंडळ संचलित,गोदावरी पब्लिक स्कूल व शंकरराव पाटील तौर प्राथमिक शाळा कुं.पिंपळगाव यांच्या संयुक्त विद्यमानाने वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात संपन्न झाला.



या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून योगिता खटावकर तहसीलदार घनसावंगी तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष सूर्योदय शिक्षण प्रसारक मंडळ कुं. पिंपळगाव संस्थेचे अध्यक्ष रवींद्र तौर व मार्गदर्शक म्हणून संस्थेच्या सचिव सौ.किरणताई तौर या उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून रवींद्र जोशी गट शिक्षणाधिकारी घनसावंगी,सौ.संगीताताई लोंढे सरपंच कुं. पिंपळगाव,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पक्षाचे तालुकाध्यक्ष दत्तात्रय तौर,फिरोजभाई कुरेशी, हारूनभाई पठाण,मतीन शेख,राधाकृष्ण भालेकर,प्रकाश बिलोरे,भूषण तौर,गणेशजी ओझा,राम तौर,सोपान काळे, विनोद तौर,तसेच कुं.पिंपळगाव चे केंद्रप्रमुख सुनील खोडदे, गुंज केंद्राचे केंद्रप्रमुख प्रमोद येडले, मूर्ती शाळेचे मुख्याध्यापक ज्ञानदेव सोळंके,देवी दहेगाव शाळेचे मुख्याध्यापक रामेश्वर आर्दड,मुख्याध्यापक प्रदिप चव्हाण,गोदावरी पब्लिक स्कूलचे प्रशासक विनायक कदम,पत्रकार लक्ष्मीकांत कुलकर्णी हे उपस्थित होते. यावेळी शाळेच्या वतीने कार्यक्रमाचे अध्यक्ष,उद्घाटक मार्गदर्शक व प्रमुख अतिथी यांचा पुष्पहार,शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर गोदावरी पब्लिक स्कूल कुं.पिंपळगाव व शंकरराव पाटील तौर प्राथमिक शाळा कुं.पिंपळगाव या शाळेतील विद्यार्थ्यांचा विविध गुणदर्शन कार्यक्रम घेण्यात आला,या चिमुकल्यांच्या बहरदार कार्यक्रमाने उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक प्रदिप चव्हाण यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजयकुमार काळे,कंटूले अंकिता,महेश आर्दड,यांनी केले. तर विष्णु शिंदे यांनी आभार मानले.यावेळी विद्यार्थी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रतिष्ठित कुटुंबाचा क्रूर चेहरा अंबाजोगाईतील घटनेने चव्हाट्यावर

## सासऱ्याने सुनेच्या कपाळावर रिवाल्वर रोखून दिली धमकी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई येथील एका प्रतिष्ठित कुटुंबा विषयी सध्या शहरभर नव्हे तर बीड जिल्ह्यात चर्चा सुरू आहे. कारण चक्क सुनेने सासू-सासरे, नंदा आणि दीर यांच्यावर अंबाजोगाई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

बीड तालुक्यातील जवळच असेल एका गावातील शेतकरी कुटुंबातील एका मुलीचा विवाह अंबाजोगाई येथील हर्षवर्धन चंद्रशेखर वडमारे या व्यक्तीशी २ ऑगस्ट २०२१ रोजी बीड येथील सूर्या लॉन्स येथे थाटात करण्यात आला. काही महिने विवाह झाल्यानंतर आनंदाचे वाटू लागले. मात्र या प्रतिष्ठित कुटुंबाचा क्रूर चेहरा हळुवार पुढे येऊ लागला. कुटुंबातील व्यक्तींनी सुन म्हणून स्विकारले नाही. तिच्याकडे माहेरावरुन पैसे आन असा तगादा लावला. पैशाची वारंवार मागणी करण्यात येऊ लागली. तिला जाणीवपूर्वक मारहाण करणे, शारीरिक, मानसिक छळ करणे असा त्रास सुरु कुटूंबातील सदस्य तीला देवू लागले. पत्ती हर्षवर्धन चंद्रशेखर वडमारे याचे बाहेर अनेक अफेअर असल्याचे पत्नीला समजले. तिने काही बोलण्या ऐवजी न बोलता काही दिवस काढले. मात्र पत्नी काहीच बोलत नसल्याने हर्षवर्धनने आपले चाळे आणि रंग हे उधळायला सुरुवात केले. मात्र क्षमतेपेक्षा अधिक या मुलीच्या डोक्याच्यावर पाणी गेल्याने तिने जाब विचारल्यावर तिला मारहाण सुरू झाली. तिचा मोबाईल फोडण्यात आला. याविषयी सासरे चंद्रशेखर वडमारे हे अंबाजोगाई शहरातील प्रतिष्ठित व्यक्ती या ठिकाणीच त्यांचे एक मंगल कार्यालय देखील आहे. पती हर्षवर्धन हा तीच्या पत्नीचा छळ करु लागला. सासर्याला सुनेने सांगितल्या नंतर जाणीवपूर्वक अनेक दिवस दुर्लक्ष केले. पीडित मुलीने वडिलांना सर्व हकीगत सांगितल्यानंतर काही दिवसाने डायल ११२ वर तक्रार केली. चौकशीसाठी पोलीस घरी आल्यानंतर घरातील गोष्ट बाहेर जाऊ नये म्हणून मुलीला रिवाल्वरचा धाक दाखवून गप्प बसण्यासाठी धमकावले. या गोष्टीची वाच्यता जर घरा बाहेर केली तर बरं होणार नाही. याविषयी मुलीच्या घरच्यांनी देखील वारंवार पोलिसांना बोलल्यानंतर सुनेला सासरा थेट रिवाल्वर डोक्याला लावून धमकावत असल्याने ती कोणाला काही सांगत नव्हती मात्र काही दिवसांपूर्वीच अत्याचार डोक्याच्या वर गेला आणि थेट मुलीने वडिलांना फोन केला. वडिलांनी देखील तात्काळ विलंब न लावता ११२ ला फोन करत पोलिसांना या घटनेची माहिती देताच पोलीस प्रशासन घटनास्थळी दाखल झाले. त्यावेळेस सुनेने आपली आपबीती ही पोलिसांना सांगितली. अखेर या सगळ्या प्रकरणावर अंबाजोगाई पोलीस ठाण्यात ४९८ (अ) ३४२, ३२३, ५०४, ५०६, ४२७, ३४३, आणि ३/२५ आर्म अँक्ट प्रमाणे तीचा पती हर्षवर्धन चंद्रशेखर वडमारे, सासरा चंद्रशेखर विष्णुपंत वडमारे, सासू अरुणा चंद्रशेखर वडमारे आणि दोन नंदा एक दीर यांच्यावर वरल कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र या मुलीच्या सासर्याची मुजोरी एवढी की मुलीला नांदवायचं ही नाही आणि घटस्फोटही द्यायचं नाही. या धर्तीवर तुला काय करायचे ते करून घे. आमचं कोणी वाकड करणार नाही. अशा धमक्या मुलीला येऊ लागल्या मात्र सध्या आता मुलीचं सर्वसामान्य असलेले शेतकरी कुटुंब भयभीत वातावरणात आहे. यामध्ये मुलगी देखील नेहमीच्या टॉर्चरमुळे तणावग्रस्त अवस्थेत आहे. शेवटी महिला आयोगामध्ये ही काही तडजोड झाली नसल्याने आता ती मुलगी न्याय मागत आहे. महिला आयोगाला देखील या वडमारे कुटुंबाने दाद दिली नाही. याप्रकरणी गुन्हा नोंद झाल्यानंतर मुलगा अटक आहे. तर, रिवाल्वरचा धाक दाखवून धमकी देणारा सासरा अद्याप फरार आहे.

*आरोपींना लवकरच अटक करु*

आर्म ऍक्ट प्रकरणातील ६ आरोपींपैकी विवाहितेच्या पतीला अटक केली असून इतर आरोपीच्या शोधासाठी व मोबाईल लोकेशन प्रमाणे तपास कार्य सुरू आहे. त्यांच्या जवळील नातेवाईकांजवळ आरोपी मिळून आले नाहीत, फोन च्या लोकेशन नुसार लवकरच त्यांना अटक करू. मनोज निलंगेकर, सहाय्यक पोलिस निरीक्षक, शहर पोलिस ठाणे, अंबाजोगाई.



**जालनाः विठ्ठला टावर्स मध्ये सकाळी सहाच्या सुमारास बँक ऑफ इंडिया चे मॅनेजर कमलेश कुमार यांच्या घरामध्ये शॉर्टसर्किटमुळे फ्रीजला आग लागून घरातील किचन मधील सर्व साहित्य जळून खाक झाले असून जीवित हानी झाली नसून फायर ब्रिगेडने हे आग आटोक्यात आणली.(छायाः किरण खानापुरे जालना)**

## शालेय साहित्याचे वाटप करून प्रितमताई मुंडे यांचा वाढदिवस साजरा

**पाटोदा । प्रतिनिधी**

**शालेय साहित्याचे वाटप करून भाजपच्या नेत्या माजी दबंग खा. डॉक्टर प्रितमताई मुंडे ताईसाहेब यांचा पाटोदा शहरातील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत वाढदिवस उत्साहात साजरा चिमुकल्यांनी व्हिडिओ कॉल वर संवाद साधत दिल्या शुभेच्छा**

बीड जिल्ह्याच्या भाजपच्या नेत्या माजी खासदार डॉ प्रितमताई मुंडे ताईसाहेब यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत आज केंद्रीय प्राथमिक शाळा जिल्हा परिषद पाटोदा येथे भाजपचे जिल्हा सरचिटणीस अँड सुधीर घुमरे यांच्या आयोजनाखाली शालेय साहित्य वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून दिव्य मराठीचे पाटोदा तालुक्यातील नामांकित पत्रकार अँड महेश बेदरे थेरला येथील सामाजिक कार्यकर्ते चंदू दुधाळ जवळाला येथील माजी उपसरपंच प्रवीण देवडे तसेच मुख्याध्यापिका राऊत मॅडम , या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रसिद्ध साहित्यिक निवेदनकार सुरेखाताई खेडकर यांच्या सह जिल्हा परिषद शाळेतील सर्व शिक्षक वर्ग यांची उपस्थिती होती. त्यावेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस ऍडव्होकेट सुधीर भुमरे ने आपले मनोगत व्यक्त करताना खासदार डॉक्टर प्रीतम ताई मुंडे यांनी गेली दहा वर्ष जिल्ह्याचे खासदार म्हणून काम करत असताना बीड जिल्ह्याचा जिव्हाळ्याचा प्रश्न नगर परळी रेल्वे मार्गाची काम त्यांच्या कारकिर्दीमध्ये भरघोस असा निधी केंद्र सरकारकडून पंतप्रधान नरेंद्र मोदी रेल्वे प्रशासन यांच्याकडून खेचून आणत हे बीड जिल्हा वाशियांची स्वप्नपूर्ती कडे वाटचाल होताना आज नगर वरून बीड पर्यंत रेल्वे धावली आहे यात प्रीतम ताई यांचा सिंहाचा वाटा आहे तसेच बीड जिल्ह्यातील सर्व पत्रकार बांधव रेल्वे कृती समिती यांच्या देखील लढ्याचे यश आहे असे अँड सुधीर घुमरे मरे यांनी मनोगत व्यक्त केले तसेच आपण दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील कुठलाही खंड न पडु देता सातत्य ठेवत प्रीतम ताई च्या वाढदिवसानिमित्त सामाजिक शालेय साहित्य वाटपासारखे उपक्रम यापुढेही राबवणार असल्याचा संकल्प केला, यावेळी पत्रकार महेश बेदरे यांनी देखील यावेळी प्रियतताई मुंडे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या, शालेय विद्यार्थिनी प्रीतम ताई यांना भरभरून व्हिडिओ कॉल करून बर्थडे साँग म्हणत वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या

पान ६ वरून...

### मधुकर महाराज खाडे

आहे, त्यामुळे शरीर आहे, तोपर्यंत ईश्वर सेवेत समर्पित केले पाहिजे. ईश्वराचे चिंतन केल्याने समाधान प्राप्त होते. मृत्यूनंतर सोबत धन, कुटुंब, शरीर असे काहीच येत नाही. केलेल्या कर्माची पावती मात्र सोबत राहत असते. मधुकर महाराज खाडे यांच्या कर्माची पावती सर्वश्रुत आहे. ते होळ येथील भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचा आधारस्तंभ होते. त्यांचा मुकुंदराज संस्थानमध्ये नेहमी संपर्क असायचा. त्यांच्या जाण्याने मुकुंदराज संस्थानचीही हानी झाली. त्यांनी ह.भ.प.अर्जुन महाराज लाड गुरुजी यांच्या सहवासात संपूर्ण जीवन घालवले. भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्था, शिवछत्रपती क्रीडा व व्यायामशाळा उभारली. त्यातून असंख्य रत्न घडविले, असे मत किसन महाराज पवार यांनी व्यक्त केले. यावेळी होळचे ग्रामस्थ, संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, आजी-माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ह.भ.प.अर्जुन महाराज लाड यांचे होणार काल्याचे किर्तन

होळ येथे श्री संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे संस्थापक, व्याकरणाचार्य ह.भ.प. अर्जुन महाराज लाड गुरुजी यांचे बुधवारी (दि.१९) काल्याचे किर्तन होणार असून कीर्तन सप्ताहाची सांगता आहे. तसेच, वै.पै.मधुकर महाराज खाडे यांच्या गंगापुजनाचा कार्यक्रम होणार आहे. या किर्तन, कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन खाडे परिवाराच्यावतीने करण्यात आले आहे.

### श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलात

उपस्थित राहावे. असे आवाहन व्याख्यानमाला समितीचे अध्यक्ष तथा श्री सिद्धेश्वर माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप , व्याख्यानमाला समितीचे कार्यवाह तथा उपप्राचार्य डॉ गजानन होन्ना , भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक प्रकाश दुगड, अमरनाथ खुर्पे, श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी, कार्यवाह अड विश्वास जोशी, महाविद्यालय समितीचे अध्यक्ष अभय कोकड, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप, प्राथमिक शालेय समितीचे अध्यक्ष पवन मानधने , सीबीएसई चे अध्यक्ष तेजस महाजन,शिशु विहार विभागाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत जोशी,प्राचार्य डॉ मुकुंद देवर्षी , माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर, प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती सुमती गिरी,सीबीएसई विभाग प्रमुख प्रिन्सिपॉल श्रीमती वंदना मिटकरी, शिशु विहार विभाग प्रमुख श्रीमती वर्षा कुलकर्णी यांनी केले आहे.

### राधेश्याम धस यांच्या

ऐकावे असे प्रेरणादायी प्रा.वसंत हंकारे यांचे व्याख्यान होणार आहे. तर शुक्रवार दि.२१ रोजी सकाळी ९ वाजता भव्य रक्तदान शिबिर आयोजित केले आहे. तसेच सायंकाळी ६ वाजता प्रसिद्ध सिने अभिनेते क्रांतीनाना मळेगावकर यांचा न्यू होम मिनिस्टर खेळ पैठणीचा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या सर्व कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन राधेश्याम धस मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

### बैलगाडा शर्यतीमध्ये

आले तर दोन नंबरच्या श्री खंडोबा प्रसन्न वर्णा बैलगाडा जोडीचे मालक यांना सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती उमरी यांच्या कडुन २१ हजार १२१रू.चे तिसरा नंबर आलेले महारूद्र प्रसन्न हादगाव यांना महादेव माणे कडुन ११ हजार १११ रूपये.चौथा नंबर आलेले सुभाष मुरकुटे नित्रुड यांना पत्रकार वैजनाथ घायतिडक यांच्या कडुन ९ हजार ९९९ रूपये पाचवा नंबर अर्जुन जाधव व विजय पवार यांना ज्ञानेश्वर घायतिडक यांच्या कडुन ७ हजार ७७७ रूपये सहावा नंबर आलेले श्री शंभू महादेव प्रसन्न खवणे पिंपरी यांना बळीराम घायतिडक यांच्या कडुन ५ हजार ५५५ रूपये सतवा नंबर आलेले प्रकाश पौळ व राठोड अंगलगाव या बैलगाडा मालकाला मथुरदास घायतिडक यांच्या कडुन ४ हजार ४४४ रूपये तर आठवे बक्षीस नारायण गड प्रसन्न बीड यांना नितीन घायतिडक यांच्या कडुन ३ हजार ३३३ रू ची रोख रक्कम देऊन सर्व बैलगाडा मालकांना सन्मानित करण्यात आले हा बैलगाडा शर्यत पाहण्यासाठी जिल्हाभरातून बैलगाडा प्रेमी आले होते तर या बैलगाडा शर्यतीमध्ये संपूर्ण मराठवाड्यातून १०९ बैलगाडा प्रेमींनी भाग घेतला हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती उमरी यांच्या कार्यकर्त्यांनी काम पाहिले.

### महाजनवाडी येथील वार्षिक

करिता गावातील पालकांनी ३८५८० रुपये बक्षीस म्हणून दिले.सदरील कार्यक्रम गटशिक्षणाधिकारी समंदर खान, शिक्षण विस्तार अधिकारी मधुकर तोडकर,केंद्रप्रमुख आबासाहेब हंगे यांच्या प्रेरणेने , मुख्याध्यापक सर्जेराव आंधळे यांच्या मार्गदर्शनाखाली तुकाराम माळकर,दीपा जाधव मॅडम,कैलास भवर यांनी गेली १५ दिवस घेतलेल्या अथक परिश्रमाने रामप्रसाद वीर यांच्या साथीने शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य,सरपंच ,उपसरपंच व महाजनवाडी येथील समस्त ग्रामस्थांच्या सहकार्यातून पार पडला.

### खोलेश्वर विद्यालय दिंद्रुड येथे

या प्रवेश पुर्व शिष्यवृत्ती परीक्षा साठी तब्बल २६५७ विध्यार्थी सहभागी झाले होते, व परीक्षेचा निकाल लगेच तीन तासात जाहीर केला व गुणवंत विद्यार्थी जाहीर करण्यात आले. बीड जिल्ह्यातील व इतर जिल्ह्यातील विद्यार्थी, विध्यार्थ्यांचे माता व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे नियोजन खोलेश्वर विद्यालय शिक्षक व खोलेश्वर मल्टीस्टेट कर्मचारी यांनी योग्य प्रकारे केले.

### रोटरी सेंट्रल ने वृक्षारोपण

आव्हान होते परंतु रोटरी सेंट्रल कडून दर आठ दिवसाला पाणी दिल्याने ही झाडे आज दिमाखाने डौलत आहेत.

आता उन्हाळ्यात या झाडांना टँकरद्वारे पाणी देण्याचा संकल्प माजी नगरसेवक शरद यादव यांनी केला असून त्या निमित्ताने छ.शिवाजी महाराज चौकात घेण्यात आलेल्या कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष सहाल चाऊस व वृक्षारोणास भरीव सहकार्य करणारे नारायणराव डक माजी नगरसेवक शरद यादवसह रोटरी अध्यक्ष पांडुरंग चांडक व सेक्रेटरी रो.प्रभाकर शेटे यांनी वृक्ष पूजन करून रस्त्यावरील या झाडांना टँकरद्वारे पाणी देऊन या शुभ कार्याचा शुभारंभ करण्यात आला.रो.अण्णासाहेब तौर, संतोष ( यादव ) नायबळ, रो.विनोद जाधव प्रोजेक्ट चेअरमन रो.नारायण गंडे.,रो.अंकुश राठोड,रो.सुदर्शन थावरे,डॉ.अशोक घुबडे सह अनेक रोटरी सदस्य उपस्थित होते.

cmyk

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
बुधवार दि.१९ फेब्रुवारी २०२५
४

# मराठवाड्यातील ७५ प्रकल्पांत उपयुक्त साठा निम्म्यावर



मराठवाड्यातील ७५ मध्यम प्रकल्पातील उपयुक्त पाणीसाठा ५६.११ टक्क्यांवर आला आहे. दुसरीकडे ७५१ लघु प्रकल्पातील पाणीसाठ्यातही मोठी घट झाली असून त्यामधील पाणीसाठा ४४.१९ टक्क्यांवरच आला असल्याची माहिती जलसंपदा विभागाकडून देण्यात आली.


अजून उन्हाळ्याचे तीन महिने जाणे बाकी असताना झपाट्याने घटत असलेला लघु, मध्यम प्रकल्पांसह गोदावरी नदीवरील पाणीसाठा किंचित चिंता वाढवणारा ठरला आहे. मराठवाड्यातील मोठ्या ११ प्रकल्पातील उपयुक्त पाणीसाठा ७३.६२ टक्क्यांवर आला आहे.

त्यापैकी निम्न दुधनात प्रकल्पातील उपयुक्त पाणीसाठा सर्वात कमी ५५ टक्क्यांवर असून माजलगाव प्रकल्पात ५७ टक्के, विष्णुपुरी मध्ये ६० टक्के निम्न मनारमध्ये ६२ टक्के, सिद्धेश्वर मध्ये ६३ टक्के सीना कोळेगाव मध्ये ६९ टक्के जायकवाडी ७५ टक्के मांजरा, उर्ध्व पैनगंगा, येलदरीमध्ये प्रत्येकी ७९ टक्के तर निम्न तेरणामध्ये सर्वाधिक ८३ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. १८२ लघु प्रकल्पातील पाणी साठा ४० टक्यांच्या आत मराठवाड्यातील १८२ लघु प्रकल्पातील उपयुक्त पाणीसाठा ४० टक्क्यांच्या आत आला आहे. यामध्ये छत्रपती संभाजीनगर मधील ९८ लघु प्रकल्पात ३७ टक्के,जालन्यातील ५७ प्रकल्पात ३५ टक्के तर हिंगोलीतील २७ लघु प्रकल्पात सर्वात कमी ३१ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे.

या व्यतिरिक्त बीडमधील १२६ व परभणीतील २२ प्रकल्पात सरासरी ४१ टक्के, धाराशिव मधील २०६ प्रकल्पात ४७ टक्के, नांदेड मधील ८० प्रकल्पात ४६ टक्के,तर लातूर मधील १३५ प्रकल्पात ५४ टक्के उपयुक्त पाणी साठ्याच्या समावेश आहे.

२ लघुप्रकल्प कोरडे ३५ जोत्याखाली : मराठवाड्यातील ७५१ लघु प्रकल्पांपैकी बीड व धाराशिव मधील प्रत्येकी एक मिळून दोन लघू प्रकल्प कोरडे पडले आहेत. याशिवाय ३५ लघु प्रकल्पातील पाणीसाठा जोत्याखाली गेला आहे. त्यामध्ये जालन्यातील १३, धाराशिवमधील १०, लातूर व परभणी नांदेड मधील प्रत्येकी एक, हिंगोलीतील ३, बीड मधील ६ तर जालन्यातील १३ लघु प्रकल्पांचा समावेश आहे. याशिवाय तीन मध्यम प्रकल्पातील पाणीसाठा जोत्याखालीच आहे. त्यामध्ये धाराशिवमधील दोन व जालन्यातील एका प्रकल्पाचा समावेश आहे.झपाट्याने घटताहेत मध्यम प्रकल्प : मराठवाड्यातील ७५ मध्यम प्रकल्पात ५६ टक्केच उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. यामध्ये छत्रपती संभाजीनगरमधील १६ मध्यम प्रकल्पात ४९ टक्के,जालन्यातील ७ प्रकल्पात ४३ टक्के ,बीडमधील १६ प्रकल्पात ६२ टक्के,लातूर मधील आठ प्रकल्पात ५३ टक्के,धाराशिव मधील १७ प्रकल्पात ६० टक्के ,परभणीतील दोन प्रकल्प ६० टक्के तर नांदेडमध्ये ९ प्रकल्पात ६३ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे.

## महाराष्ट्रातील तापमानाचा पारा चढला पुढील दिवसांत आणखी वाढ होईल!



देशातील तापमानातील चढ उतार कायम आहेत. राज्यात उन्हाच्या झळाही वाढल्या आहेत. काही ठिकाणी तापमानाचा पारा ३६ अंशांच्याही पुढे पोचला. आज सकाळपर्यंतच्या २४ तासांमध्ये सोलापूर येथे राज्यातील उच्चांकी ३७.३ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. राज्याच्या तापमानात वाढ होईल, असा अंदाज हवामान विभागाने दिला. उत्तर भारतातही तापमानात काहीशी वाढ झाली आहे. आज पंजाबमधील पठाणकोट येथे देशाच्या सपाट भूभागावरील नीचांकी ७.८ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.

तर वायव्य भारतात १२.६ किलोमीटर उंचीपर्यंत ११० ते १२० नॉट्स वेगाने पश्चिमेकडील जोरदार वाऱ्यांचे प्रवाह वाहत आहेत. उत्तर भरतातील तापमानावर या घडामोडींचा परिणाम दिसून येत आहे. राज्याच्या कमाल तापमानात वाढ होत आहे. आज सकाळपर्यंतच्या २४ तासांमध्ये सोलापूरमध्ये ३७.३ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली होती. तर सांगली येथे ३७.२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.जेऊर आणि परभणी येथे ३७ अंश सेल्सिअस तापमान होते. त सातारा, छत्रपती संभाजीनगर येथे कमाल तापमान ३६ अंशांवर होते. उन्हाच्या झळा चांगल्याच वाढल्या असून, उकाड्यामुळे घामाच्या धारा वाहू लागल्या आहेत. राज्यातील तापमानातील वाढ कायम राहील, असा अंदाज हवामान विभागाने दिला.

## कोल्हापुरात फूलकोबीला २ ते ४ रुपये किलो दर
### पीक शेतात गाढण्याची शेतकऱ्यांवर वेळ



कोल्हापूर जिल्ह्यात भाजीपाल्याचे दर पडल्याने शेतकरी संकटात सापडला आहे. मागच्या महिन्याभरापासून फूलकोबीला अवघा २ ते ४ रूपये किलो असा दर मिळत आहे तर टोमॅटोही १० रूपये किलोने जात आहे. मागच्या १५ दिवसांपूर्वी एका शेतकऱ्याने दुधी भोपळ्याला दर नसल्याने उभे पीक कापून टाकले होते. अशीच वेळ फूलकोबी उत्पादक शेतकऱ्यांवर आली आहे.महिनाभरापासून फूलकोबी भाजीपाल्याचा दर पडला आहे. किलोला २ ते ४ रुपये दर मिळत असल्याने घातलेल्या खतांचा दर मिळणे अशक्य झाले आहे. शिरोळ, हातकणंगले या तालुक्यांमध्ये अनेक शेतकरी भाजीपाला पिकाकडे वळले आहेत. मात्र, अपेक्षित दर नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.

दानोळी (ता. शिरोळ) गावचे शेतकरी चवगोंडा कटारे यांनी फूलकोबीचे उत्पादन घेतले आहे. कटारे म्हणाले की, फूलकोबीला चांगला दर मिळेल म्हणून कोबीची लावण केली. महिनाभरापासून दर नाही. आमचा फूलकोबी चालू झाला आहे. आता अवघ्या २-३ रुपये किलोने विक्री होत आहे. या दराने रोपांचे पैसेही निघत नाहीत. माल काढणी, पॅकिंग, वाहतूक, हमाली-दलालीचा खर्च हा येणाऱ्या पट्टीपेक्षा अधिक आहे.जिल्ह्यात ऊस गेल्यानंतर नवीन उसाच्या लागणीत आंतरपीक म्हणून कोबीचे पीक अनेकांनी घेतले आहे. त्यामुळे बाजारपेठेत आवक वाढली आहे. त्याचा परिणाम दरावर झाला असून, शेतकऱ्यांना हे आंतरपीक नुकसानकारक ठरले आहे. तसेच फक्त फूलकोबीचे पीकही घेतले आहे. त्यांचा तर हंगामच वाया गेला आहे.दर नसल्याने शेत तयार करण्याचा, रोपे, लागण, मशागत, औषध याचा खर्च सोसावा लागत आहे. पीक तसेच ठेवले तर त्याचा आणि औषध व मशागतीचा खर्च वाढत आहे. त्यामुळे फूलकोबी पीक काढून टाकण्याशिवाय शेतकऱ्यांजवळ पर्याय राहिला नाही. जानेवारीपूर्वी फूलकोबीला किलोस ५ रुपयांपेक्षा अधिक दर मिळत होता. मात्र, बाजारात मोठ्या प्रमाणात कोबीचे उत्पादन वाढल्याने दर गडगडले आहेत. शेतकरी महिनाभरापासून दर वाढेल या अपेक्षेने उत्पादन खर्च करीत आहेत. मात्र, काढणी आणि पाठवणीचा खर्च पण पदरात न पडल्याने नुकसान सोसावे लागत आहे. असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

## शाश्वत शेतीसाठी आंतरपिके महत्त्वाची



वर्षानुवर्षे शेतकरी त्यांच्या शेतात आंतरपिके घेत आहेत. पोषक तत्वांची आवश्यकता, वाढीचा कालावधी आणि कीड व रोग संबंधी प्रतिकारशक्ती या गोष्टींसाठी एकमेकांना सुसंगत असणार्या दोन किंवा अधिक पिकांची एकाच शेतात लागवड करणे यालाच आंतरपीक म्हणतात. आंतरपीक घेण्याचे जसे अनेक फायदे आहेत तसेच या पद्धतीचा अवलंब करताना काही आव्हाने सुद्धा शेतकऱ्यांसमोर उभी राहतात.

आंतरपीक घेण्याचे फायदे : आंतरपीक घेण्याचे शेतकऱ्यांना अनेक फायदे आहेत त्यातील महत्त्वाचे म्हणजे अतिरिक्त उत्पन्नाचा स्त्रोत: आंतर पिकांमुळे शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्न मिळू शकते. विशेषत: फळझाडे यांसारख्या बारमाही पिकांच्या सुरुवातीच्या काळात भाजीपाला, औषधी वनस्पती किंवा कडधान्ये यासारख्या जलद-वाढणाऱ्या कमी कालावधीच्या पिकांची शेतात लागवड केल्यास शेतकऱ्यांना मुख्य पिकांच्या उत्पादना व्यतिरिक्त आंतरपिकातून अधिकचे उत्पन्न मिळू शकते.

नैसर्गिक कीड नियंत्रण : वेगवेगळ्या प्रकारच्या हानिकारक तसेच मित्र किडी या आंतर पिकांवर निवास करतात. त्यामुळे पिकांचे नुकसान कमी होते. काही पिके किंवा वनस्पती जसे, झेंडू आणि तुळस हे किडींसाठी नैसर्गिक प्रतिबंधक कीटकनाशके म्हणून देखील कार्य करू शकतात, ज्यामुळे कीटकनाशकांचा अनावश्यक वापर कमी होतो. मातीचे आरोग्य सुधारते: आंतरपीके मातीतील सेंद्रिय पदार्थ, नत्राचे स्थिरीकरण आणि पोषक घटकांचे प्रमाण वाढवून जमिनीची सुपीकता आणि गुणवत्ता राखण्यास मदत करतात. कोबीवर्गीय पिके तसेच कडधान्ये पिके बहुतेक वेळा आंतरपीक म्हणून वापरली जातात. या पिकात वातावरणातील नत्र शोषून घेण्याची क्षमता असते. जे मुख्य पीक आणि त्यानंतरच्या पिकांना फायदेशीर ठरते.

जमिनीची धूप थांबते : आंतरपीक हे जमिनीवर आच्छादन सारखे कार्य करते त्यामुळे मातीची रचना सुधारून जमिनीची होणारी धूप रोखता येते. जैवविविधता संवर्धन: आंतरपीक कीटक आणि मित्र कीटकांसाठी अधिक वैविध्यपूर्ण निवास प्रदान करते त्यामुळे जैवविविधता वाढून पर्यावरणात चांगला समतोल निर्माण होतो, कीटक आणि रोगांचा प्रादुर्भाव कमी होतो.

कमी जोखीम : आंतरपिक घेतल्याने हवामानातील बदल, कीड, रोग किंवा बाजारातील चढउतारामुळे पीक अपयशी होण्याचा धोका कमी होतो. एका वेळी अधिक पिके घेऊन, शेतकरी शेतीतील अनिश्चिततेवर मात करून स्थिर आणि योग्य परतावा सुनिश्चित करू शकतात.

आंतरपीक घेण्यात येणाऱ्या अडचणी : आंतरपिकाचे संभाव्य फायदे असूनही, यात काही आव्हाने आणि अडथळे सुद्धा येतात.

गुंतागुंतीचे पीक व्यवस्थापन : एकच पीक घेण्यापेक्षा आंतरपिकांची रचना आणि व्यवस्थापन करण्यासाठी अधिक ज्ञान आणि कौशल्ये आवश्यक आहेत. आंतरपिके घेताना शेतकर्यांनी एकमेकांना सुसंगत पिके, त्यांच्या वाढीचा पॅटर्न, लागवडीचे अंतर, आणि कापणीची वेळ, आणि पिकाची एकमेकांना होणारी स्पर्धा यांचा विचार करणे आवश्यक आहे. यंत्रसामुग्री आणि पायाभूत सुविधांचा अभाव : एकच पिकाची लागवड आणि आंतरपीक पद्धतीसाठी लागणारी यंत्रसामुग्री आणि पायाभूत सुविधा या फार वेगळ्या असतात. विविध पिके घेण्यास सक्षम होण्यासाठी शेतकर्यांना नवीन किंवा सुधारित उपकरणांमध्ये गुंतवणूक करावी लागेल, जसे की लागवड आणि कापणी यंत्र आणि साठवण सुविधा. संशोधन आणि विस्ताराचा अभाव : आंतरपीक घेण्यासाठी शेतकर्यांना गरजेची विश्वसनीय माहिती, मार्गदर्शन आणि प्रशिक्षण अजूनही जास्त प्रमाणात उपलब्ध नाहीत. तसेच आंतरपीक यासंबंधी संशोधन आणि विस्तार यांचा अभाव सुद्धा आहे. धोरणाचा आणि बाजारातील प्रोत्साहनाचा अभाव: सध्याची सरकारी धोरणे आणि मोनोकल्चरला समर्थन देणाऱ्या बाजारपेठेकडून आंतर पिकाला चांगला प्रतिसाद मिळत नाही. शेतकर्यांना कर्ज, विमा, अनुदान आणि पीक फेरपालट प्रमाणपत्र प्रदान करण्यात अडचणी येऊ शकतात.

काही प्रमुख आंतरपिकांची उदाहरणे : नारळ + केळी + अननस : ही एक लोकप्रिय आंतरपीक पद्धत आहे, ज्यामध्ये मुख्य पीक नारळ आहे. केळी आणि अननस हे आंतरपीक म्हणून घेतले जातात, ज्यामुळे शेतकर्यांना अतिरिक्त उत्पन्न आणि अन्न सुरक्षा मिळते. या प्रणालीमुळे जमिनीची सुपीकता आणि पाणी धारण क्षमता वाढते. कीड व्यवस्थापन सुधारते. आंबा + पेरू + पपई : आंबा या मुख्य पिकात पेरू आणि पपई हे आंतरपीक म्हणून घेतले जातात. पीक वाढीच्या वेगवेगळ्या अवस्थेमुळे शेतकर्यांना वर्षभर उत्पन्न आणि फळ उत्पादन मिळते. यामुळे मातीचे आणि पर्यावरणाचे आरोग्य सुधारते कीटकांचे नैसर्गिक नियंत्रण होते. ऊस + कडधान्ये : या आंतरपीक पद्धतीत ऊस या मुख्य पिकात सोयाबीन, चवळी आणि तूर यांसारख्या कडधान्य पिकांची लागवड केली जाते. ही कडधान्य पिके नायट्रोजनचे स्थिरीकरण करून जमिनीची सुपीकता सुधारतात. यामुळे तणांची वाढ, कीटकांचा प्रादुर्भाव आणि सिंचनाची गरज कमी होते. कापूस + कडधान्ये : कापूस या मुख्य पिकात हरभरा, मूग आणि उडीद यासारखी कडधान्ये आंतरपीक म्हणून घेतली जातात. यामुळे पशुंसाठी प्रथिनेयुक्त चारा आणि खाद्य मिळते. या प्रणालीमुळे जमिनीची सुपीकता व पाण्याची कार्यक्षमता वाढून कीड व्यवस्थापन सुधारते.

## दिन विशेष

### जागतिक दिवस
### छत्रपती शिवाजी महाराज जयंती

### महत्वाच्या घटना

१६३० : माता जिजाऊ ने शिवनेरी किल्ल्यावर शिवबांना जन्म दिला.
१८७८ : थॉमस एडिसनने फोनोग्राफचे पेटंट घेतले.
१८८४ : यू. एस. ए. च्या दक्षिण भागाला ६० चक्रीवादळांनी तडाखा दिला.
१९४२ : पर्ल हार्बरच्या हल्ल्यानंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रुझव्हेल्ट यांनी जपानी वंशाच्या अमेरिकन नागरिकांना बंदिवासात ठेवण्याच्या आदेशावर सह्या केल्या
१९८६ : आज पहिल्यांदा संगणकीकृत रेल्वे आरक्षण तिकिटांची सुरुवात झाली.
२००३ : तंबाखू उत्पादनांच्या जाहिरातींवर संपूर्णपणे बंदी घालण्याच्या विधेयकाला केंद्रीय मंत्रीमंडळाने मंजुरी दिली.
२०१४ : आजच्या दिवशी फेसबुक ने व्हॉट्सअॅप ला १९ बिलियन डॉलर ला विकत घेण्याचे घोषित केले, आणि दुसऱ्या दिवशी व्हॉट्सअॅप ला विकत सुद्धा घेतले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४७३ : निकोलस कोपर्निकस सूर्यकेन्द्री विश्वाच्या संकल्पनेचा सिद्धांत मांडणारा पोलिश खगोलशास्त्रज्ञ आणि गणितज्ञ (मृत्यू: २४ मे १५४३)
१६३० : छत्रपती शिवाजी महाराज (मृत्यू: ३ एप्रिल १६८०)
१८५९ : स्वांते अर्हेनिअस स्वीडीश भौतिक व रसायनशास्त्रज (मृत्यू: २ आक्टोबर १९२७)
१८९८ : भारतीय स्वातंत्र्य सैनिक गोकुलभाई भट्ट यांचा जन्म.
१८९९ : गुजरातचे दुसरे मुख्यमंत्री बळवंतराय मेहता यांचा जन्म.
१९०० : आजच्या दिवशी गुजरात चे माजी मुख्यमंत्री बळवंतराय मेहता यांचा जन्म.
१९०६ : माधव सदाशिव गोळवलकर तथा श्री गुरूजी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे दुसरे सरसंघचालक (मृत्यू: ५ जून १९७३)
१९१९ : अरविंद गोखले मराठी नवकथेचे जनक, 'गंधवार्ता' या त्यांच्या कथेला आशियाई-अरबी-अफ्रिकी कथा स्पर्धेचे पहिले पारितोषिक मिळाले. भारतीय उपखंडातील प्रसिद्ध लेखकांच्या लघुकथांचा अभ्यास करण्यासाठी त्यांना १९८४ मधे केंद्र सरकारची फेलोशिप मिळाली होती. (मृत्यू: २४ आक्टोबर १९९२)
१९२२ : सरदार बियंत सिंग 'खलिस्तानी' विभाजनवादी चळवळीचा कणा मोडून काढणारे पंजाबचे मुख्यमंत्री (मृत्यू: ३१ ऑगस्ट १९९५)
१९२५ : आजच्या दिवशी प्रसिद्ध कलाकार राम वी. सुतार यांचा जन्म.
१९३० : दक्षिणात्य चित्रपटाचे दिग्दर्शक काशिनाथ विश्वनाथ यांचा जन्म.
१९४३ : भारतीय अभिनेत्री बीना बॅनर्जी यांचा जन्म.
१९६२ : हॅना मंडलिकोव्हा झेकोस्लोव्हाकियाची टेनिस खेळाडू
१९७७ : प्रसिद्ध गायक अवधूत गुप्ते यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८१८ : पेशव्यांचे अखेरचे सरसेनापती सरदार बापू गोखले यांचे आष्टी येथे निधन
१८९५ : देशाचे प्रसिद्ध प्रकाशक मुंशी नवल किशोर यांचे निधन.
१९१५ : नामदार गोपाळ कृष्ण गोखले थोर समाजसेवक, काँग्रेसचे अध्यक्ष, संसदपटू, भारत सेवक समाजाचे संस्थापक (जन्म: ९ मे १८६६)
१९५६ : केशव लक्ष्मण दफ्तरी ज्योतिर्गणितज्ञ, संशोधक आणि बुद्धीप्रामाण्यवादी विचारवंत, वैदिक वाङ्मय, वेदान्त तत्त्वज्ञान आणि होमिओपाथी हे त्यांच्या संशोधनाचे विषय होते. अकरा उपनिषदांचे त्यांनी मराठीत भाषांतर केले. (जन्म: २२ नोव्हेंबर १८८०)
१९५६ : आचार्य नरेन्द्र देव प्रजा समाजवादी पक्षाचे नेते, लखनौ विद्यापीठाचे कुलगुरू, सत्याग्रहाचे पुरस्कर्ते व उत्तर प्रदेशातील आमदार (जन्म: ? ? १८८९)
१९७८ : पंकज मलिक गायक व संगीतकार (जन्म: १० मे १९०५)
१९९७ : डेंग जियाओ पिंग सुधारणावादी चिनी नेते (जन्म: २२ ऑगस्ट १९०४)
१९९७ : राम कदम संगीतकार (जन्म: २८ ऑगस्ट १९१८)
२००२ : प्रसिद्ध मराठी अभिनेते अनंत मराठे यांचे निधन.
२००३ : अनंत मराठे पौराणिक हिन्दी व मराठी चित्रपट अभिनेते
२०१७ : भारताचे माजी सर न्यायाधीश अल्तमस कबीर यांचे निधन.

## तिळाची साल काढण्यासाठी यंत्र

तीळ बियांच्या एकूण वजनाच्या सुमारे १७ टक्के वजन त्यावरील सालीचे असते. कवचामध्ये ऑक्सालिक ॲसिड आणि अयोग्य तंतूंचे प्रमाण असते. ऑक्सालिक ॲसिड अन्नातील कॅल्शिअमच्या जैविक वापराचे प्रमाण कमी करू शकते, चवीवर परिणाम करू शकते. साल काढल्यानंतर तीळ बियांमधील ऑक्सालिक ॲसिडचे प्रमाण ३ टक्यांवरून ०.२५ टक्क्यापर्यंत कमी झाल्याने प्रथिनांची पचनक्षमता सुधारते. त्यामुळे प्रक्रियेच्या दृष्टीने तिळाची साल काढणे आवश्यक आहे. तीळ हे फॅटी ॲसिड्स आणि फाइटोस्टेरॉल्सचा उत्कृष्ट स्रोत आहे.

साल काढणारे यंत्र

तिळाची साल काढणारे यंत्र सहजपणे हाताळता येते. गिअर शाफ्ट यंत्रामधील मिक्सरला फिरवतो. यामुळे तिळाची साल मोकळी होते. या प्रक्रियेत पाणी वापरले जाते, ज्यामुळे साल सहजपणे सुटते. तुटलेली साल हलकी असल्यामुळे दाण्यांपासून वेगळी होते. यंत्रामध्ये साल आणि दाणे वेगळे करण्यासाठी विशेष यंत्रणा असते. हलके वजन असलेली साल एकीकडे निघून जाते, आणि जड दाणे वेगळ्या भागात साठवले जातात. यंत्रामुळे तिळावर मोठ्या प्रमाणात प्रक्रिया होऊ शकते. त्यामुळे वेळ आणि मेहनत वाचते. यंत्र चालविण्यासाठी विशेष कौशल्याची गरज नाही.

# सरकारचा दिखाऊपणा उघड; पीक विमा कंपनीस हप्ता देय केलाच नाही

## किसान सभेच्या आंदोलनामुळे प्रकरण उजेडात: जिल्ह्यातील लाखो शेतकरी खरीप पीक विम्यापासून वंचीत

बीड। प्रतिनिधी

खरीप २०२४ हंगामातील नुकसान भरपाई, सण २०२३ मधील प्रलंबित विमा दावे निकाली काढत लवकरात लवकर शेतकऱ्यांना पीक विमा मिळावा याकरिता अखिल भारतीय किसान सभेकडून सोमवार दि १७ पासून विमा कंपनी कार्यलयासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले होते.खरीप २४ मधील पीक विमा बाबत शासन हिस्सा विमा कंपनीला न दिल्याने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याची ४ महिन्या पासून प्रतीक्षा करावी लागत आहे.खरीप सन २०२३ या हंगामातील नुकसान भरपाई १० दिवसात देऊन अन्य मागण्या पूर्ण करण्यात येतील असे लेखी आश्वासन विमा कंपनी कडून आंदोलनकर्त्यांना देण्यात आले. दिलेल्या आश्वासनाची पूर्तता न झाल्यास किसान सभा पुन्हा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करत विमा घेतल्याशिवाय हटणार नसल्याची ठाम भूमिका घेत हे बेमुदत धरणे आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे.



खरीप २०२४ हंगामातील नुकसान भरपाई निश्चित करून लवकरात लवकर नुकसान भरपाईचे वाटप करण्यात यावे, खरीप २३-२४ मधील प्रलंबित मंजूर विमा दावे वर्ग करण्यात यावे, प्रलंबित दावे काही करणास्थाव वर्ग होणे बाकी राहिले तर संबंधित शेतकरी याद्या सबंधित तालुका कृषि कार्यालय यांना देण्यात यावे तसेच तालुका विमा प्रतिनिधि मार्फत शेतकरी यांच्या कडे प्रसारित करण्यात यावेत यासह इतर मागण्या घेत किसान सभेकडून सोमवार दि १७ रोजी पीक विमा कंपनी कार्यलयासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू करण्यात आले होते.खरीप २४ मधील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या जिह्यातील शेतकऱ्यांना नुकसाई भरपाई बाबत विमा कंपनी कडून अद्याप शासनाकडून शासन हिस्सा रक्कम विमा कंपनीला देण्यात आला नसल्याचे विमा देण्यात अडथळा येत असल्याचे कंपनीकडून सांगण्यात आले.या आंदोलनाची तीव्रता पाहता विमा कंपनी प्रतिनिधी आणि जिल्हा प्रशासनाने तात्काळ दखल घेत काही मागण्या येत्या दहा दिवसात योग्य ती कार्यवाही करून बाधित शेतकऱ्यांना भरपाई देण्याचे लेखी आश्वासन दिले.या आंदोलनामध्ये किसान सभेचे काँ मुरलीधर नागरगोजे, कॉ.दत्ता डाके कॉ.भगवान बडे, कॉ.बालाजी कडबाने, कॉ.सुभाष डाके, दादासाहेब शिरसाट कॉ.गंगाधर पोटभरे यांच्यासह जिह्यातील शेकडो शेतकरी मोठया संख्येने सहभागी झाले होते.

### शेतकऱ्यांच्या लढ्यास आ.धस यांची भेट

आपल्या न्याय हक्कासाठी वारंवार चकरा मारून ही प्रश्न निकाली निघत नसल्याने किसान सभेच्या नेतृत्वाखाली शेकडो शेतकऱ्यांनी विमा कंपनी समोर सुरू केलेल्या बेमुदत धरणे आंदोलनास आ.सुरेश धस यांनी भेट देत आंदोलनकर्ते आणि विमा कंपनी प्रतिनिधी यांच्यात चर्चा करण्यात आली. यावेळी खरीप २४ मधील नुकसान भरपाई देण्याबाबत शासन हिस्सा कंपनीला प्राप्त झाले नसल्याचे समजले असता याबाबत मुंबईला जाऊन कृषिमंत्री आणि वित्त मंत्री यांची भेट घेऊन लवकरात लवकर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना खरीप २४ चा विमा मिळण्यासाठी प्रयत्न करू असे त्यांनी सांगितले. जिल्ह्यातील शेतकऱ्यांची सोयाबिन, तूर, कापूस खरेदी तसेच अन्य प्रश्नावर सभागृहात आवाज उठवू असे आश्वासन दिले.

पीक विमा कंपनीच्या वतीने सन २०२३ मधील खरीप व रब्बी हंगामातील शेतकऱ्यांना पीक विम्याचे वाटप, सन २०२४ मधील अतिवृष्टीने नुकसान झालेल्या सर्व शेतकऱ्यांना सरसकट पीक विम्याचे वाटप, रब्बी २४-२५ मधील पीक विम्याचे वाटप इत्यादी प्रलंबित विमा प्रश्नावर काही दिवसामध्ये शेतकऱ्यांना भरपाई देण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले आहे. विमा कंपनी कडून जर या आश्वासनाची पूर्तता नाही झाल्यास किसान सभा जिह्यातील शेकडो बाधित शेतकऱ्यांना घेऊन जिल्हाधिकारी कार्यलयासमोर भरपाई पदरात पडत नाही तो पर्यंत मुक्कामी आंदोलन करण्यात येईल तसेच सोयाबीन कापूस तूर जर हमीभावाने खरेदी नाही झालं तर भावांतर योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना मदत करा अशी मागणी यावेळी करण्यात आली आहे.

**अजय बुरांडे,जिल्हाध्यक्ष**

---

## थोडक्यात



### रहनुमा कोचिंग क्लासेसचा शेख उमर ठरला सर्वोत्कृष्ट विद्यार्थी

बीड : इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ दिनांक १६ फेब्रुवारी २०२५ रोजी रहनुमा कोचिंग क्लासेस येथे मान्यवरांच्या उपस्थित पार पडला. यात वर्षभरातील सर्वोत्कृष्ट विद्यार्थ्याचा पुरस्कार शेख उमर शाकेर या विद्यार्थ्याने पटकावला. त्याला मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. बीड शहरातील जमजम कॉलनी येथे असलेल्या रहनुमा कोचिंग क्लासेस मध्ये विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून नेहमी वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येतात. त्यात प्रामुख्याने विद्यार्थ्यांची वर्षभरातील उपस्थिती तसेच त्याने वर्षभरात वेगवेगळ्या सराव परीक्षेत मिळविलेल्या गुणांचे एकत्रिकरण करून जो विद्यार्थी यात अव्वल ठरेल त्याला दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात येणाऱ्या समारंभामध्ये मान्यवरांच्या हस्ते सन्मानित केले जाते. यावेळी हा पुरस्कार शेख उमर शाकेर या दहावीच्या विद्यार्थ्याने हा पुरस्कार पटकावला. त्याला बलभीम महाविद्यालयाचे प्राध्यापक प्रमुख पाहुणे सुरवसे सर, मेड एक्सिलेन्स क्लासेसचे संचालक विकार सर, इमरान मोमीन सर आणि रहमान सर यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी रहनुमा कोचिंग क्लासेस चे मुजाहेद सर, सहशिक्षक शफिक सर, हलीमा मिस, अवद सर, शाहरुख सर, खतिजा मिस, अमिना मिस यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्व शिक्षक वृंदांनी विद्यार्थ्यांना इयत्ता दहावीच्या परीक्षेसाठी शुभेच्छा देऊन सर्व विद्यार्थ्यांनी पुढील आयुष्यात उच्च शिक्षण घेऊन चांगले जबाबदार नागरिक बनावे अशा सदिच्छा व्यक्त केल्या.

### पेन्शन अदालत व कार्यशाळेचे आयोजन

बीड: सर्व कार्यालय प्रमुख/आहरण व संवितरण अधिकारी यांना सुचित करण्यात येते की, दि.२१.०२.२०२५ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता समाज कल्याण कार्यालय आवारातील आंबेडकर भवन येथे पेन्शन अदालत व कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले आहे. महालेखापाल नागपूर व कोषागार कार्यालय बीड यांच्या वतीने निवृत्तीवेतन धारकांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी पेन्शन अदालत आयोजित केलेली आहे. तरी जिल्हा कोषागार अधिकारी बीड यांच्या वतीने जिल्हयातील सर्व कार्यालय प्रमुख/आहरण व संवितरण अधिकारी व संबंधित लिपीक व निवृत्तीवेतन धारक यांना विनंती करण्यात येते की, आपण आपल्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आवश्यक अभिलेखे घेवून वरील स्थळी उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी यांना केले आहे.

### डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना

बीड: अल्पसंख्याक विकास विभागाच्या शासन निर्णय दि.११-१०-२०१३ अन्वये राज्यातील मदरशांच्या आधुनिकीकरणासाठी पायाभुत सुविधा निर्माण करणे, ग्रंथालयासाठी अनुदान, शिक्षकांचे मानधन इत्यादी लाभ देण्यासाठी सदर योजना सन २०१३-१४ पासुन राबविण्यात येत आहे. सदर योजना सन २०२४-२५ या वर्षात राबविण्याबाबत अल्पसंख्याक विकास विभाग, परिपत्रक अविवि-२०२४/प्र.क्र.६७/का.६, दिनांक-१३.०२.२०२५ अन्वये नव्याने प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे. त्याअनुषंगाने इच्छुक मदरशांनी या डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना, शासन निर्णय क्र. अविवि-२०२४/प्र.क्र.१५२/१०/का. ६, दिनांक ११.१०.०१३ च्या शासन निर्णयासोबत दिलेल्या विहीत नमुन्यात परिपूर्ण प्रस्ताव जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, बीड या कार्यालयात दिनांक १५ फेब्रुवारी ते २२ फेब्रुवारी २०२५ दुपारी ५.०० वाजे पर्यंत सादर करण्याबाबत दिनांक-१३.०२.२०२५ च्या शासन परिपत्रकात सादर करण्याबाबत सुचित केले आहे. प्रस्तावात पेयजलाची सोय करणे. (वॉटर प्युरीफायर ची सोय),इन्व्हर्टरची सोय करणे या सोयी-सुविधांची मागणी असणे गरजेचे असल्याबाबत नमुद केले आहे. विहीत मुदतीनंतर प्राप्त प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

---

# जिल्हा प्रशासनाने मारले पण प्रसारमाध्यमांनी शेतकऱ्यांना तारले

## पवनचक्की कंपनीने नुकसान भरपाई सहित शेतकऱ्यांना मावेजा दिला

लिंबागणेश। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील बालाघाटावरील मुळुकवाडी गावातील शेतकऱ्यांने शेतकऱ्यांच्या सहमती विना कोणताही मोबदला न देताच शेत जमिनीतुन रिन्यु ग्रीन एम. एच. पी. वन. प्रायव्हेट लिमिटेड नवी दिल्ली कंपनीने आमच्या शेत जमिनीतुन माझ्या कुटुंबाच्या सहमतीशिवाय पवनचक्की प्रकल्प उभारणीसाठी पोकलेन, जेसीबी,जीप, पीक अप अशा विविध वाहनांची नियमबाह्य वाहतूक करत शेजजमीनीचे नुकसान करत असल्याची लेखी तक्रार रोहित सुरेश ढास यांनी जिल्हाधिकारी व पोलिस अधिक्षक बीड यांना दिली होती. मात्र जिल्हा प्रशासनाकडुन नेहमीप्रमाणेच दुर्लक्ष करण्यात आले. याविषयी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी प्रसारमाध्यमांच्या माध्यमातून आवाज उठवल्यानंतर पवनचक्की कंपनी ताळ्यावर आली आणि ज्वारी व गहु पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसानभरपाई व साहित्य वाहतूक करणाऱ्या गाड्या अनुषंगाने शेतकऱ्यांना मावेजा देण्यात आला यामुळे एकंदरीतच जिल्हा प्रशासनाने मारले परंतु प्रसारमाध्यमांनी तारले अशी भावना



शेतकऱ्यांनी डॉ.गणेश ढवळे यांच्याशी बोलून दाखवत प्रसारमाध्यमांचे आभार मानले.

मुळुकवाडी येथील गट क्रमांक ६५७ मधील ६२ आर शेतजमिनी मधुन रिन्यु ग्रीन एम. एच.पी.वन प्रायव्हेट लिमिटेड नवी दिल्ली कंपनीने विनासहमती शेतातुन पवनचक्की उभारणीसाठी वाहनातुन साहित्य नेल्याने जमिनीचे नुकसान होत असुन प्रतिबंध घालण्यात यावा अशी तक्रार जिल्हाधिकारी व पोलिस अधिक्षक बीड यांना केली होती. मात्र जिल्हा प्रशासनाने याची दखल घेतली नव्हती. सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी प्रसारमाध्यमांना याबाबत कल्पना दिल्यानंतर विविध दैनिकात याबाबत बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या.अखेर पवनचक्की कंपनीचे अधिकारी यांनी पवनचक्कीशी संबंधित गट क्रमांक.६४३, ६४५, ६४८, ६४९, ६५०, ६५१ मधील सर्वच शेतकऱ्यांना ज्यांच्या शेतजमिनीतुन वाहनांची वाहतुक होते त्यांना प्रति गुंठा १५ हजार रुपये मावेजा व ज्या शेतकऱ्यांचे ज्वारी व गहु पिकांचे नुकसान झाले आहे त्यांना नुकसान भरपाई दिली आहे.त्यामुळे एकंदरीतच प्रसारमाध्यमांनी शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिला आहे. जिल्हा प्रशासनाची जबाबदारी प्रसारमाध्यमांनी पार पाडली असे मत डॉ.गणेश ढवळे यांनी व्यक्त केले आहे.

# वसंतदादा पाटील महाविद्यालयाच्या वतीने वृद्धाश्रमास अन्नदान



पाटोदा। प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र व गणित विभागांच्या वतीने संस्थेचे सचिव डॉ. भारतभूषण क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त १७ फेब्रुवारी रोजी काळसंबर ता. जि. बीड स्थित 'आपला परिवार' वृद्धाश्रमास एक दिवसाकरिता अन्नदानाचा उपक्रम उत्साहात संपन्न झाला.

प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांच्या मार्गदर्शनाखाली वृद्धाश्रमाच्या संचालिका श्रीमती मनीषा पवार यांना एक दिवसाच्या अन्नदानासाठी लागणारी रक्कम प्राचार्यांच्या हस्ते ऑनलाईन पाठविण्यात आली. याप्रसंगी उपप्राचार्य तथा रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. सतीश माउलगे, भौतिकशास्त्र विभागप्रमुख प्रा. रूपेश कोकाटे, गणित विभागप्रमुख डॉ. पद्माकर ससाने, उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर, पदव्युत्तर विभाग संचालक डॉ. गणेश पाचकोरे, डॉ. लक्ष्मण गाडेकर, प्रा. गणेश देशमाने, डॉ. अशोक नाईक, डॉ. विनोदचंद्र पवार उपस्थित होते.

---



# वसंतदादा पाटील महाविद्यालयात निबंध स्पर्धा संपन्न

पाटोदा। प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात संस्थेचे सचिव डॉ. भारतभूषण क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त १८ फेब्रुवारी रोजी निबंध स्पर्धा उत्साहात संपन्न झाली.

प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाच्या भूगोल विभागामार्फत पर्यावरण संरक्षण व वन्यजीव संरक्षण या विषयांवर ही निबंध स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेत ३६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. याप्रसंगी भूगोल विभागप्रमुख डॉ. ज्ञानेश्वर चौधरी, डॉ. सोमनाथ लांडगे, प्रा. संतोष खाकरे, डॉ. मच्छिन्द्र शेळके, प्रा. शेख समद उपस्थित होते.

# रामनगर येथे शिवजन्मोत्सवासह हरिनाम सप्ताहाची आज सांगता

## योगीराज महाराज यांचे काल्याचे कीर्तन ;उपस्थित राहण्याचे ग्रामस्थांचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त मागील १३ वर्षांपासून बीड तालुक्यातील रामनगर येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले जात आहे. या सप्ताहास बुधवार, १२ फेब्रुवारीपासून श्री क्षेत्र रामगड संस्थानचे मठाधिपती स्वामी योगीराज महाराज यांच्या उपस्थितीत प्रारंभ झाला आहे. आज बुधवार, १९ फेब्रुवारी रोजी सकाळी शिवजन्मोत्सवानिमित्त भव्य मिरवणूक निघणार आहे. त्यानंतर दुपारी १२ ते २ यावेळेत महंत स्वामी योगीराज महाराज रामगडकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होईल. त्यानंतर महाप्रसादाचा आयोजन केले आहे. तरी पंचक्रोशितील भाविकांनी



याचा लाभ घ्यावा असे आवाहन रामनगर ग्रामस्थांच्यावतीने करण्यात आले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्ताने बीड तालुक्यातील रामनगर येथे एक दिवसाची जयंती साजरी न करता सात दिवस अखंड हरिनाम सप्ताहाच्या माध्यमातून शिवविचारांचा जागार केला जातो. या सप्ताहात भावार्थ रामायण व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन केले होते. तर रतनताई महाराज, शिवाजी महाराज नेवडे, ज्ञानेश्वरीताई कृष्णा रत्नपारखी, बाळकृष्ण महाराज मोरे, श्रीकृष्ण महाराज उबाळे, उत्रेश्वर महाराज पुर्भे, परमेश्वर महाराज माने यांची प्रवचन सेवा झाली. तर विनोदाचार्य भाऊसाहेब महाराज पन्हाळकर, भागवताचार्य दत्ता महाराज हुके, विनोदाचार्य दिपक महाराज बादाडे, वारकरीभुषण अण्णा महाराज शेळके, बालकिर्तनकार सोहम महाराज सातपुते, आचार्य भगवंत महाराज पुरी, विनोदाचार्य परमेश्वर महाराज इंगळे यांची कीर्तन सेवा होणार आहे.

### आज रक्तदान शिबीरासह वृक्षारोपणाचे आयोजन

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाबरोबरच दरवर्षीप्रमाणे याही वर्षी आज १९ फेब्रुवारी रोजी रक्तदान शिबीर, वृक्षारोपण शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. दरवर्षी रक्तदान शिबीराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतो. यावेळीही जास्तीत जास्त तरुणांनी रक्तदान करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

---

# मूकनायक बनले शोषीतांचा आवाज - ॲड.जयमंगल धनराज

## राज्यस्तरीय मूकनायक पुरस्काराचे थाटात वितरण

बीड । प्रतिनिधी

देशातील अस्पृश्य, शोषीत, वंचितांच्या समतेच्या लढातील एक शस्त्र म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मूकनायक या वृत्तपत्राची सुरुवात केली. त्यातून शोषीतांचे दुख:, वेदना, संघर्ष यांना वाचा फोडण्याचे काम केले. डॉ. बाबासाहेबांनी आपल्या सामाजिक, राजकीय जीवनात विविध टप्पांवर पाच वृत्तपत्र चालविली. परंतु मूकनायक आंबेडकरी पत्रकारितेचा आरंभबिंदू होता. 'मूकनायक' खऱ्या अर्थाने शोषीतांचा आवाज बनला, असे प्रतिपादन डॉ.बाबासाहेब आंबेडकर लॉ कॉलेजचे माजी प्राचार्य ॲड. जयमंगल धनराज यांनी केले. पी.ई.एस. अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या अशोका हॉल येथे रविवारी शाक्यमुनि प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित कार्यक्रमात ज्येष्ठ पत्रकार दिवाकर शेजवळ यांना पहिला राज्यस्तरीय 'मूकनायक पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी ॲड. धनराज बोलत होते. यावेळी विचारमंचावर ग्रामिण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक अशोक सिरसे, पी.ई.एस.अभियांत्रीकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अभिजित वाडेकर, नालंदा प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे, पत्रकार विजय बहादुरे यांची प्रमुख उपस्थिती होती. २५ हजार रुपये, मानपत्र, स्मृतीचिन्स असे या पुरस्काराचे स्वरुप होते.



यावेळी ॲड. धनराज यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विविध सामाजिक लढ्यांचा आढावा घेत त्यामध्ये वृत्तपत्रांनी बजावलेल्या कामगिरीची सविस्तर माहिती दिली. बाबासाहेबांनी बदलत्या सामाजिक, राजकीय परिस्थितीनुसार मूकनायक, बहिष्कृत भारत, जनता, समता आणि प्रबुद्ध भारत अशी वृत्तपत्रांची नावे बदलली. बाबासाहेबांच्या सामाजिक न्यायाच्या लढ्याला सर्वसामान्यांपर्यंत पोहचून त्यांना संघर्षासाठी तयार करण्याचे काम या सर्व वृत्तपत्रांनी केले. तत्कालीन काळात आवाज नसलेल्या घटकांचा आवाज ही वृत्तपत्रे बनली. बाबासाहेब एका बाजुला लढा देत होते तर दुसऱ्या बाजुला वृत्तपत्रांच्या माध्यमातून वैचारित, तात्वीक अधिष्ठान देऊन ते जनतेपर्यंत पोहोचत होते.

बाबासाहेबांच्या चळवळीत गतीमानता होता. बदलत्या परिस्थितीनुसार त्यांनी लढ्यात, संघटनेत, वृत्तपत्रांत बदल केला. त्यामुळेच त्यांची चळवळ यशस्वी होऊन कोट्यवधी जनतेचा उद्धार झाला. आजाही शोषीत घटकांचे प्रश्न संपलेले नसून आजही संघर्षाची गरज आहे. परंतु बाबासाहेबांनंतर चळवळीला गतीशिल ठेवणारा नेता नसल्याने सामाजिक न्यायाची चळवळ पुढे जात नसल्याची खंत यावेळी ॲड. धनराज यांनी व्यक्त केली.

प्रास्ताविक प्रतिष्ठानचे सचिव प्रा. संजय कांबळे यांनी केले. बहारदार सूत्रसंचलन पंकज शिंदे यांनी तर आभार प्रा. राम गायकवाड यांनी मानले. समारंभास 'शाक्यमुनि प्रतिष्ठान' चे उपाध्यक्ष प्रा.दिपक जमधाडे यांच्यासह मराठवाड्यातील बहुजन चळवळीतील नागरिक, विद्यार्थी, युवक-युवती, कर्मचारी, व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वतेसाठी प्राचार्य संजय कांबळे, प्रा.दिपक जमधाडे, प्राचार्य अर्चना साळवे, प्राचार्य ज्योती मोरे, प्रा. संतोष प्रधान, प्रा.प्रल्हाद तारू, पवन मस्के, प्रा. भगत, प्रा. जाधव यांनी परिश्रम घेतले.

# जिजाऊ मल्टीस्टेटच्या ठेव घोटाळ्याची ईडी, सीआयडी चौकशी करा

## खाडे गेले, गोल्डेसाहेब आले...अद्याप मुख्य तिजोरीचा पंचनामा झाला नाही ; खा.सुप्रियाताईंना ठेवीदाराचे निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट को.ऑ.सो.लि. बीड सुमारे २०० कोटीचा घोटाळा झाला. बीड व धाराशिव जिल्ह्यातील सुमारे ३००० ठेवीरांची लुबाडणूक झाली.

तपास अधिकारी पो.नि. खाडे यांनी लाच घेऊन अप्रत्यक्ष आरोपींना मदत केली,तपासाचे तीन तेरा वाजवले. पो.नि.खाडे गेले, गोल्डे आले अद्याप जिजाऊ मल्टीस्टेट मधील मुख्य तिजोरीचा पंचनामा झाला नाही. अजब तपास होतो आहे. २०२३ मधील गुन्हा फॉरेन्सिक अहवाल सुद्धा आला नाही. मुख्य आरोपी बबन शिंदे यांनी अंग झटकले. पोलीस म्हणतात आरोपींचा बीपी वाढतो..जास्त चौकशी करता येत नाही.सखोल तपास झाला पाहिजे. या भुमिकेतुन ठेवीदारांचा लढा चालू आहे.

घोटाळ्याचा सर्वंकष छडा लावण्यासाठी अथवा उच्च स्तरीय तपास यंत्रणा मार्फत चौकशी व्हावी. या मागणीचे निवेदन खा.सुप्रिया सुळे यांना ठेवदारांनी दिले.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्रजी मस्के, खा. बजरंग बाप्पा सोनवणे,आ.संदिप भैया क्षिरसागर यांच्या मार्गदर्शना खाली मस्साजोग ता.केज येथे राष्ट्रवादी नेत्या खा. सुप्रिया सुळे यांची भेट घेऊन...जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट ठेवीदार कृती समितीच्या वतीने.,.. ठेव घोटाळा प्रकरणाची चौकशी ईडी अथवा सीआयडी मार्फत चौकशी करणे बाबत निवेदन देण्यात आले. यावेळी इंजि. सखाराम कळासे,शेख कुतुब भाई, मारुती तिपाले, भाऊसाहेब परसे,प्रा.मानेसर,आर.एस. गायकवाड, अच्युतराव वाघ, सुर्यभान नवले, प्रविण पोपळे,आदी उपस्थित होते.



या निवेदन म्हणटले आहे की, बीड जिल्ह्यातील जिजाऊ माँसाहेब साहेब मल्टीस्टेट को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सो. लि. बीड या पतसंस्थेच्या अध्यक्षा सौ.अनिता बबन शिंदे , त्यांचे पती बबन विश्वनाथ शिंदे, मुलगा मनिष बबन शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी अश्वीनी वांढरे, आणि संस्थेचे संचालक मंडळ यांनी संगनमताने ठेवीदार बांधवांचा विश्वासघात करुन सुमारे २०० कोटीचा अपहार केला आहे . ३००० पेक्षा अधिक गोरगरीब, मजूर, कामगार, शेतकरी, निवृत्त कर्मचारी ठेवीदांरांची लुट केली आहे.

या ठेव घोटाळा प्रकरणात दि. ७ जुलै २०२३ दरम्यान ठेवीदारांनी बीड व धाराशिव जिल्ह्यात एकूण चार गुन्हे नोंद केले आहेत. बीड, धाराशिव जिल्ह्यातील अन्यायग्रस्त ठेवीदारांच्या वतीने कृती समितीच्या माध्यमातून मोर्चा आंदोलनातून शासन दरबारी सखोल चौकशीची मागणी केलेली आहे. स्थानिक बीड पोलिस यंत्रणे कडून प्रकरणाचा योग्य पध्दतीने तपास झालेला नाही. दि.२१जानेवारी २०२५ मध्ये ठेवीदारांच्या पाठपुराव्यामुळे एमपीआयडी प्रस्ताव मंजूर झाला. परंतु एमपीआयडी १९९९ कायद्यानुसार हा प्रस्ताव अपूर्ण असून सर्व आरोपी व इतर संबंधीतांच्या मालमत्तांचा समावेश प्रस्तावात केला नाही. फक्त ठेवीदारांनी सुचवलेल्या मालमत्तांचा समावेश असुन पोलीस व महसूल प्रशासनाने मालमत्ता तपास कामी ठोस

पाठपुरावा केलेला नाही. पोलीसांनी आरोपीं कडून बीड व इतर जिल्ह्यांतील मालमत्तेची माहीती घेण्याचं धाडस केले नाही. २०२३ मधील गुन्हा परंतु आज ही मुख्य शाखेतील तिजोरीचा पंचनामा झालेला नाही. बँकेत असलेल्या लॉकरची तपासणी झाली नाही. तिजोरी व लॉकर मधील सोनं अथवा चिज वस्तूचं काय झालं. हा प्रश्न अनुत्तरित आहे. पुर्ण तपास संशयास्पद आहे. फितुर तपास अधिकारी यांनी १कोटी ची लाच मागितली व तसा गुन्हा नोंद आहे. लाच घेतल्याने तपास सकारात्मक दिशेने

झाला नाही.याचे स्पष्ट पुरावे समोर आले. आरोपीकडे मालमत्ता लपवलेली असुन निश्चितपणे परदेशात गुंतवणूक केलेली आहे. असा ठाम विश्वास ठेवीदारांचा आहे. शासनाने प्रयत्न केल्यास पैसा व मालमत्ता निश्चितपणे मिळू शकतो.

कृपया ठेवीदारांना न्याय देण्यासाठी खालील मुद्द्यांवर लक्ष केंद्रीत करून अथवा अशा उच्चस्तरीय यंत्रणे मार्फत चौकशी करणे बाबत आपण पूर्णतः सहकार्य

करावे. अशी आग्रही मागणी करणारे सविस्तर निवेदन दिले आहे.

# मधुकर महाराज खाडे यांच्या जाण्याने मुकुंदराज संस्थानची मोठी हानी झाली

## ह.भ.प. किसन महाराज पवार यांचे प्रतिपादन ; होळ येथे सुश्राव्य किर्तन

**केज । प्रतिनिधी**

मधुकर महाराज खाडे यांच्या निधनाने केवळ होळच्या भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचीच नव्हे तर अंबाजोगाई येथील मुकुंदराज संस्थानचीही मोठी हानी झाली आहे, असे प्रतिपादन अंबाजोगाई येथील मुकुंदराज संस्थानचे अध्यक्ष ह.भ.प.किसन महाराज पवार यांनी व्यक्त केले.



वै.पै.मधुकर महाराज खाडे यांचे दि.६ फेब्रुवारी रोजी अपघाती निधन झाले. केज तालुक्यातील होळ येथील श्री संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे संस्थापक ह.भ.प.अर्जुन महाराज लाड यांच्या मार्गदर्शनाखाली गंगापुजनानिमित्त भगवान बाबा मंदिरात दि.१३ ते १९ फेब्रुवारी दरम्यान किर्तन सप्ताह होत आहे. ह.भ.प.किसन महाराज पवार हे सोमवारी (दि.१७) किर्तन सेवेप्रसंगी बोलत होते. यावेळी होळ येथील संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ह.भ.प.डॉ. प्रल्हाद महाराज ढाकणे शास्त्री, किर्तनकार ह.भ.प. प्रा.ईश्वर महाराज मुंडे, ह.भ.प.कृष्णा महाराज रेवले, वाल्मीक महाराज खाडे यांची उपस्थिती होती. किसन महाराज पवार यांनी संत तुकाराम महाराज यांचा रंगी रंगे रे श्रीरंगे काय भुललासी पतंगे शरीर जायाचे ठेवणे धारिसी अभिलाष झणे नव्हे तुझा हा परिवार द्रव्यदारा क्षणभंगूर अंतकाळीचा सोयरा तुका म्हणे विठो धरा हा अभंग किर्तन सेवेसाठी घेतला होता. किसन महाराज पवार म्हणाले, ईश्वराने दिलेले शरीर एकदिवशी जाणारच पान ३ वर



माजलगाव;- तालुक्यातील नागडगाव येथील शिवाजीराव गुळभिले यांचे अपघाती दुःखद निधन झाले असता त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन करताना कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती तथा विद्यमान संचालक नितीनराव नाईकनवरे यावेळी सोबत रोषणपुरीचे चेअरमन बालासाहेब डांगे, रणजित उफाडे

# श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलात प. पू. श्री. गोळवलकर गुरुजी व्याख्यानमालेचे आयोजन

**माजलगाव । प्रतिनिधी**

प्रति वर्षी प्रमाणे याही वर्षी येथील श्री. सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलात प. पू. श्री. गोळवलकर गुरुजी व्याख्यानमालेचे आयोजन दि २१ ते २३ फेब्रुवारी (त्रैदिवसीय) दरम्यान करण्यात आले आहे. व्याख्यानमालेचे हे २० वे वर्ष आहे.



या व्याख्यानमालेत पहिले पुष्प २१ फेब्रुवारी शुक्रवार रोजी डॉ गोरक्षनाथ देगलूरकर (जेष्ठ पुरातत्वविद) हे आपले मंदिरे आपल्या मुर्ती या विषयावर गुंफणार आहेत, दुसरे पुष्प २२ फेब्रुवारी शनिवार रोजी विजयजी देवांगन (पश्चिम क्षेत्र, सहसंपर्कप्रमुख रा. स्व. संघ )हे राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य या विषयावर गुंफणार आहेत तर तिसरे पुष्प २३ फेब्रुवारी रविवार रोजी अक्षय जोग (स्वातंत्र्यवीर सावरकर संशोधक, अभ्यासक, लेखक, विश्व संवाद केंद्र, पश्चिम महाराष्ट्र कार्यकारिणी सदस्य) हे स्वातंत्र्यवीर सावरकर: आक्षेप आणि वास्तव

या विषयावर गुंफणार आहेत ही व्याख्यानमाला श्री सिद्धेश्वर महाविद्यालय प्रांगण माजलगाव येथे सायंकाळी साडे सहा वाजता होणार असून शहरातील डॉक्टर, वकिल,पत्रकार , प्रतिष्ठित नागरिक, शैक्षणिक संकुलाचे माजी विद्यार्थी, पालक यांनी या व्याख्यानास पान ३ वर

## राधेश्याम धस यांच्या वाढदिवसा-निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

आष्टी । प्रतिनिधी

जामगाव चे सरपंच तथा युवा नेतृत्व राधेश्याम धस यांच्या वाढदिवसानिमित्त आष्टी येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून गुरुवार दि.२० फेब्रुवारी रोजी मुला मुलींच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकणारे प्रा.वसंत हंकारे यांचे व्याख्यान तर शुक्रवार दि २१ फेब्रुवारी रोजी रक्तदान शिबिर,न्यू होम मिनिस्टर यासह विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती राधेश्याम धस मित्र मंडळाच्या वतीने देण्यात आली आहे.



आष्टी तालुक्यातील जामगावचे सरपंच तथा युवा नेतृत्व राधेश्याम धस यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.यंदाही दि.२० फेब्रुवारी गुरुवार रोजी सायंकाळी ७ वाजता आष्टी शहरातील पंचायत समिती प्रांगणात आई-वडील मुल-मुली यांच्या नात्यातील सुंदर व्याख्या सांगणारे व संपूर्ण कुटुंबांनी एकत्रित येऊन पान ३ वर

# खोलेश्वर विद्यालय दिंद्रुड येथे प्रवेश पुर्व शिष्यवृत्ती परीक्षा व गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील खोलेश्वर विद्यालय दिंद्रुड येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष दिलीपरावजी पारेकर, तर प्रमुख पाहुणे प्रा.आबासाहेब सावंत सर , शिवाजी महाविद्यालय परभणी, पांडुरंग वाकसे सर, अनिल जाधव सर, यावेळी उपस्थित होते.



खोलेश्वर विद्यालय दिंद्रुड आयोजित प्रवेश पुर्व शिष्यवृत्ती परीक्षा २०२५ नुसार ३ री ते ९ वी प्रत्येक वर्गातील टॉप २० पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती,प्रथम क्र.१००००रु, व्दितीय क्र.७०००रु., तृतीय क्र.५०००रु., पात्र झाले, त्यांचा सन्मान चिन्ह व गुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. २०० विद्यार्थांना मिळणार शिष्यवृत्ती चा लाभ, गुणवत्तेचा ध्यास घेणारी शाळा, स्पर्धा परीक्षेचे ज्ञान देणारी शाळा विद्यार्थ्यांकडून स्पर्धा परीक्षेची तयारी करून येणारी शाळा खोलेश्वर विद्यालय असल्याचे पालकांनी सांगितले, शाळेच्या प्राचार्या सरिता फपाळ मॅडम यांनी शाळेची यशोगाथा सादर केली.

# जन्माचा दाखला देण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र कडा यांच्याकडून रुग्णांची होतेय हेळसांड

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील कडा शहरात असणारे प्राथमिक आरोग्य केंद्र येथे झालेल्या प्रसूती ची नोंद करुन जो जन्माचा दाखला देण्यात येतो अन्? या प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी त्या पिडित पाल्यांची वारंवार हकालपट्टी करण्यात येते असा आरोप रुग्णांकडुन होतं आहे शासनाद्वारे या कामासाठी प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात स्वतंत्र ऑपरेटर ची नेमणुक देखील केली गेली तरी सुद्धा ही प्रक्रिया ऑपरेटर पाहत नसुन प्राथमिक आरोग्य केंद्रातील एक शिस्टर व इतर कर्मचारी पाहत असुन वैद्यकीय अधिकारी व तालुका वैद्यकीय अधिकारी यांचे खरंच प्राथमिक आरोग्य केंद्राकडे लक्ष आहे का असा सवाल उपस्थित होतं आहे.

मग याचा अर्थ असा की या आरोग्य केंद्रात डाटा ऑपरेटर म्हणुन त्यांचे स्वतःचे पद हे फक्त नावापुरतेच आहे असे म्हटले तरी वावगे नाही. त्याचप्रमाणे शासनाने केलेल्या नियमानुसार बाळंतपण शासकीय दवाखान्यात झाले तर बाळाचे नाव लगेच २ ते ३ दिवसात ठेवून लगेच नोंद करावी लागते. हा नियम चुकीचा म्हणता येणार नाही आणि तिचे जर कागदपत्र अपडेट म्हणजेच सुरळीत नसतील तर अशा मातेंच काय? आणि त्या मातेच्या घरच्यांनी कुठे दाद मागायची याबाबत तालुका आरोग्य अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी तथा शासनाने दखल घेणे गरजेचे आहे...

कडा प्राथमिक आरोग्य केंद्र येथील वैद्यकीय अधिकारी डॉ.सिंघम मॅडम यांच्याशी वार्तालाप न होऊ शकल्यामुळे त्यांची बाजु समजु शकली नाही.

# महाजनवाडी येथील वार्षिक स्नेहसंमेलनात प्रेक्षक झाले मंत्रमुग्ध

**चौसाळा । प्रतिनिधी**

मुलांच्या अंगी विविध कलागुण असतात. या कला गुणांची पारख करता आली पाहिजे. इंस्टाग्राम व फेसबुक च्या या जमाण्यात शाळेतील स्नेहसंमेलन ही आपली जागा टिकवून आहेत.आणि त्याला ग्रामीण भागात उदंड प्रतिसाद मिळत आहे.याचीच प्रचिती महाजनवाडी येथील स्नेहसंमेलनात आली.



जि.प.प्राथ.शाळा महाजन वाडी ता.बीड या ठिकाणी ओंकार स्वरुपा या गीतावर हातात दिवे घेऊन देवाची आराधना करणाऱ्या गाण्याने सुरुवात होऊन, पीचली माझी बांगडी, खंडोबाची कारभारीन,मुळीच नव्हते रे कान्हा माझ्या मना अशा श्रवणीय गाण्या बरोबरच महाराष्ट्रातील लोककलाकार वासुदेव गीत, चलावो ना नैनोसे बाण रे, दिल बहलता हैं मेरा आपके आ जाणे से या सारख्या लोकप्रिय हिंदी गीता सोबतच शिवरायांची महती सांगणारे एकच राजा इथे जन्माला, आम्ही शिवकन्या या रोमांचित करणारी गाणी,तसेच आजच्या समाजातील जिवंत प्रश्न म्हणजे स्त्री भ्रूण हत्या वर आधारित नाटिका ने श्रोत्यांची वाहवा मिळवत,महाराष्ट्राची लोककला असलेली लावणी चंद्रा,आता वाजले की बारा ,उगवली शुक्राची चांदणी, सांगा ना कशी दिसते मी या नऊवारी साडीवर या सारख्या ठसके बाज लावणीने श्रोत्यांना मंत्रमुग्ध करत स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. चिमुरड्यांनी सादर केलेल्या या कार्यक्रमा पान ३ वर

# बैलगाडा शर्यतीमध्ये उमरी केसरी किताब तालखेडच्या ताडेश्वर प्रसन्नने पटकाविला

## बैलगाडा शर्यतीत मराठवाड्यातील १०९ बैलगाडा प्रेमींनी घेतला सहभाग

माजलगाव । प्रतिनिधी

शिवजन्मोत्सव निमित्त उमरी येथे घेतलेल्या बैलगाडा शर्यतीमध्ये मराठवाड्यातील १०९ बैलगाडा प्रेमींनी सहभाग घेतला होता दि.१७ फेब्रुवारी रविवार रोजी दिवसभर चाललेल्या बैलगाडा शर्यतीमध्ये अंतिम फेरीमध्ये उमरी केसरीचा किताब तालखेड येथील ताडेश्वर प्रसन्न बैलगाडा ने पटकावला तर दुसरा नंबर वर्णा येथील खंडोबा प्रसन्न ने मिळवला त्यातील एक ते आठ नंबर आलेल्या बैलगाडा मालकांना रोख रक्कम व स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

शिवजन्मोत्सव निमित्त उमरी येथे बैलगाडा शर्यतीचे आयोजन दि.१७ रविवार रोजी करण्यात आले होते या बैलगाडा शर्यतीमध्ये संपूर्ण मराठवाडा मधून १०९ बैलगाडा प्रेमींनी सहभाग घेतला होता एकूण १५ फेऱ्या झाल्या होत्या.उपांत्य फेरीचा ४ फेऱ्या करण्यात आल्या तर फायनल ला एक फेरी करण्यात आली या फेरीमध्ये एक ते आठ नंबर आलेल्या बैलगाडा प्रेमींना रोख रक्कम व बक्षीस देऊन बैलगाडा मालकांना सन्मानित करण्यात



आले.उमरी केसरीचा किताब तालखेड च्या ताडेश्वर प्रसन्न चे बैलगाडा मालकाला आसाराम घायतिडक यांच्या हास्ते ३१ हजार १३१ रुपये चे रोख रक्कम देण्यात पान ३ वर

# रोटरी सेंट्रलने वृक्षारोपण केलेल्या झाडांना मिळाले जीवदान दर रविवारी टँकरने पाणी देण्याचा शरद यादव यांचा संकल्प

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक ते भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौका पर्यंत रोटरी क्लब ऑफ माजलगाव सेंट्रल च्या वतीने या वर्षी मेनरोडवर करण्यात आलेल्या वृक्षारोपणास माजी नगरसेवक शरद यादव यांच्या वतीने तीन महिने टँकरद्वारे स्वखर्चातून पाणीपुरवठा करून या वृक्षांना जीवदान देण्याचा संकल्प करण्यात केला असून छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त या कार्याचा



शुभारंभ अनेकांच्या उपस्थितीत नुकताच करण्यात आला.

माजलगाव शहरातून शेगाव ते पंढरपूर हा पालखी महामार्ग गेला असून या रस्त्यावर कुठेही सावली साठी झाड दिसत नव्हते म्हणून या मुख्य रस्त्यावर रोटरी क्लबच्या पुढाकारातून या वर्षी वृक्षारोपण करण्यात आले आहे.परंतु ही झाडे जगवणे एक मोठे पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# न्हावरा येथे त्रिमूर्ती प्लास्टिक कंपनीला आग; ५ कोटीपेक्षा जास्त नुकसान

**शिरूर । प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यातील शिरुर –चौफुला महामार्गारील न्हावरा येथिल घोडगंगा साखर कारखान्याशेजारी असणाऱ्या त्रिमूर्ती कंपनी जवळील विद्युत रोहित्रावर चारचाकी कार धडकून झालेल्या अपघातात रोहित्र खाली कोसळल्याने शॉर्ट सर्किट होऊन लागलेल्या आगीत त्रिमूर्ती प्लास्टिक कंपनी जळून खाक झाली असून यात कंपनीतील मशनरी, कच्चा माल फर्निचर व इतर साहित्य मिळून पाच कोटी पेक्षा जास्त रुपयाचे नुकसान झाले आहे.





याबाबत गुलाब पोपट पडवळ (वय ४० वर्ष, रा. बोरीपार्धी (आनंद हेरीटेज) ता. दौड, जि. पुणे) यांनी खबर दिली आहे. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार गुलाब पडवळ यांची मालकीची प्लास्टिक कंपनी न्हावरे येथे असून दि.१७ फेब्रुवारी रोजी सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास शिरुर चौफुला महामार्गावर न्हावरा ता.शिरूर घोडगंगा साखर कारखाना शेजारी असणाऱ्या त्रिमूर्ती कंपनी जवळील विद्युत रोहित्रावर चारचाकी हुंडाई कंपनीची कार क्रमांक एम. एच. १२ यु.एस. १९९४ कंपनी बाहेर असलेल्या विद्युत रोहित्राला धडकली. यामुळे रोहित्र खाली पडले व शॉर्टसर्किट झाले.

यामुळे शेजारील त्रिमूर्ती प्लास्टीक कंपनीतही शॉर्टसर्किट झाले व आग लागली. काही वेळातच आगीने रौद्ररूप धारण करून मोठ्या प्रमाणात आगीच्या ज्वाला व धूर निघू लागला पाहता पाहता संपूर्ण कंपनी आगीच्या भक्षस्थानी पडली. कंपनीचे मालक गुलाब पडवळ व मॅनेजर योगेश आरोटे त्या ठिकाणी आले त्यांनी रांजणगाव औद्योगिक वसाहतीतील व शिरूर नगर परिषद अग्निशमन दलाला बोलावले बाजूला असणाऱ्या बांधकामावरील पाण्याचे टँकर बोलवून घेतले.तब्बल साडेतीन तासाच्या प्रयत्नानंतर आग आटोक्यात आली. परंतु तोपर्यंत कंपनीमधील पाच कोटी पेक्षा जास्त रुपयांच्या मशनरी कच्चामाल जळून खाक झाला. याबाबत शिरूर पोलीस स्टेशन येथे जळीताचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास शिरूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार एन बी जाधव करीत आहे.

# कर्करोग विरोधातील लढ्यात योगदान देणाऱ्या संस्थांचा गौरव



**पुणे । प्रतिनिधी**

कर्करोगाविरोधातील लढ्यात मोलाचे योगदान देत असंख्य रुग्णांना नवजीवन देण्याचे कार्य करणाऱ्या संस्थांना पुण्यातील प्रो लाईफ कॅन्सर सेंटर आणि रिसर्च इन्स्टिट्यूट कडून एका विशेष कार्यक्रमात गौरविण्यात आले. जागतिक कर्करोग दिनाचे औचित्य साधून मंगळवारी या गौरव समारंभाचे आयोजन करणात आले होते. प्रो लाईफ कॅन्सर सेंटर आणि रिसर्च इन्स्टीट्यूटचे प्रमुख डॉ. सुमित शहा यांच्या हस्ते या संस्थाचालकांना स्मृतीचिन्ह आणि मानपत्र देवून गौरविण्यात आले. गौरव करण्यात आलेल्या संस्थांमध्ये कॅन्सर पेशंट एड असोसिएशनच्या श्रीमती सप्रू मॅडम, नाग फाऊंडेशनचे डॉ. इनामदार, मुकुल माधव फाऊंडेशनचे जितेंद्र जाधव, जगेश रोकडे , केअर इंडिया मेडिकल सोसायटीच्या श्रीमती तस्लिमा मॅडम, हेल्पिंग हँड संस्थेच्या शैला नाईक , मुदिता – न अलायन्स फॉर गिव्हिंग संस्थेचे माधव चव्हाण यांचा या गौरवमूर्तीमध्ये समावेश आहे.

या संस्था आणि संस्थाचालकांनी कॅन्सर विरोधातील लढाईमध्ये अमूल्य योगदान देत असंख्य रुग्णांना नवजीवन देण्याचे काम केले आहे.

# एटीएम कार्डची अदलाबदल करून ज्येष्ठ नागरिकांची फसवणूक; आरोपीकडून १६६ एटीएम कार्डसह १४ लाखांचा मुद्देमाल जप्त

**पुणे । प्रतिनिधी**

एटीएम कार्डची अदलाबदल करून २१ ज्येष्ठ नागरिकांच्या खात्यातून पैसे काढून फसवणूक करणाऱ्या आरोपीला विश्रामबाग पोलिसांनी अटक केली. पोलिसांनी या गुन्ह्याचा तपास करून १६ गुन्हे उघडकीस आणत आरोपीकडून १६६ एटीएम कार्ड आणि रोकडसह १४ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



राजू प्रल्हाद कुलकर्णी (वय ५४, रा. अलानहली, म्हैसूर, कर्नाटक) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. पोलिस उपायुक्त संदीपसिंग गिल यांनी दिलेल्या माहितीनुसार, एका व्यक्तीने एटीएममधून पैसे काढण्यास मदत करण्याच्या बहाण्याने ज्येष्ठ व्यक्तीच्या बँक खात्यातून २२ हजार रुपये काढून घेतले.

हा प्रकार लालबहादूर शास्त्री रस्त्यावरील बँक ऑफ महाराष्ट्रच्या एटीएम सेंटरमध्ये दोन फेब्रुवारी रोजी घडला होता. याबाबत विश्रामबाग पोलिसांनी गुन्हा दाखल केला. वरिष्ठ पोलिस निरीक्षक विजयमाला पवार यांनी या गुन्ह्याचा तपास करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार तपास पथकातील पोलिस उपनिरीक्षक मनोज बरूरे, पोलिस अंमलदार मयूर भोसले, आशिष खरात यांनी खबऱ्याच्या मदतीने आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपीचा शोध घेतला.

आरोपीच्या ताब्यातून वेगवेगळ्या बँकेचे १६६ एटीएम कार्ड जप्त केले. आरोपीने शहरात आणखी काही नागरिकांची फसवणूक केल्याची शक्यता आहे. संबंधित नागरिकांनी विश्रामबाग पोलिस ठाण्यात तक्रार द्यावी, असे आवाहन वरिष्ठ निरीक्षक विजयमाला पवार यांनी केले आहे.

पोलिस आयुक्त अमितेश कुमार, पोलिस सह आयुक्त रंजनकुमार शर्मा, अतिरिक्त आयुक्त प्रवीणकुमार पाटील, पोलिस उपायुक्त संदीपसिह गिल, सहाय्यक आयुक्त साईनाथ ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ निरीक्षक विजयमाला पवार, पोलिस निरीक्षक (गुन्हे) अरुण घोडके, पोलिस उपनिरीक्षक मनोज बरुरे, पोलिस अंमलदार अशोक माने, मयूर भोसले, सचिन कदम, गणेश काठे, आशिष खरात, अर्जुन मोरे, शिवा गायकवाड, संतोष शेरखाने, नितीन बाबर व सागर मोरे यांनी ही कारवाई केली.

# जीवन संपवण्याआधी मैत्रिणीला पाठवली ऑडिओ क्लिप पण ३ तासांनी मिळेल अशी केली सेटींग, नंतर १५ व्या मजल्यावरून उडी

पिंपरी । प्रतिनिधी

पुण्यात इंजिनिअरिंगचं शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनीने आपल्या प्रियकराच्या जाचाला कंटाळून पंधराव्या मजल्यावरून उडी घेतली आणि या घटनेनं पिंपरी चिंचवड शहर हादरलं. आपलं जीवन संपवण्याआधी तिने आपल्या मैत्रिणीला पाठवलेल्या ४२ मिनिटांच्या ऑडिओ क्लिपमधून तिच्या या निर्णयामागचं धक्कादायक कारण समोर आलं आहे. तब्बल ३७ दिवसांच्या तपासानंतर अखेर वाकड पोलिसांनी प्रियकराला बेड्या ठोकल्या आहे. सहिती रेड्डी असं या तरूणीचं नाव होतं. तिने ५ जानेवारीला ताथवडे येथील राहत्या इमारतीवरून उडी मारली होती. तिचा मित्र आणि प्रियकर प्रणव डोंगरेने शारीरिक आणि मानसिक छळ केल्यामुळं तिने हे टोकाचं पाऊल उचलल्याचं धक्कादायक सत्य समोर आलं आहे, तिने आत्महत्या करण्यापुर्वी ही क्लीप आपल्या मैत्रीणीला मिळेल अशी सोय करून ठेवली होती.



तरूणीला तिचा प्रियकर प्रणव त्रास देत असल्याचं, वेळोवेळी मानसिक छळ करत असल्याचं तिनं सांगितलं होतं. आता आपण आपलं नातं थांबवूयात, असं म्हणत तो तिला टॉर्चर करत होता. प्रणवचा शारीरिक आणि मानसिक छळ सहन होत नव्हता. म्हणून मी आता माझं आयुष्य संपवत आहे. अशा आशयाची ऑडिओ क्लिप बनवत सहिताने ती तिच्या जवळच्या मैत्रिणीला पाठवली. त्यामध्ये तिने स्वतःचा मोबाईल राहत्या इमारतीच्या टेरेसवर कुठं लपवून ठेवला आहे आणि त्याचा पासवर्ड काय आहे? हे सुद्धा पाठवलं होतं. फक्त ही ऑडिओ क्लिप पाठवल्यानंतर तीन तासाने मैत्रिणीला पोहचेल, अशी सेटिंग करुन ठेवली होती. त्यानंतर दुसऱ्या मजल्यावरील घरातून सहिती बाहेर पडली आणि तिने खाली उडी घेऊन जीवन संपवलं.

सहिती रेड्डी असं आत्महत्या केलेल्या तरूणीचं नाव आहे. सहिती ही आकुर्डीतील डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये तिसऱ्या वर्षात शिकत होती. त्यावेळी तिची आणि प्रणवची मैत्री झाली आणि मैत्रीचं रूपांतर प्रेमात झालं, आणि त्याच्याकडून होणाऱ्या शारिरीक आणि मानसिक त्रासाला कंटाळून तिने आपलं जीवन संपवलं. या प्रकरणी पोलिसांनी प्रणव राजेंद्र डोंगरे याला अटक केली आहे. त्याला तीन दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली आहे. पुण्यातील ताथवडे या ठिकाणी हा प्रकार घडला आहे. या प्रकरणी सहितीचे वडील कलुगोटाला वेंकटा सीवा रेड्डी (वय ५४) यांनी वाकड पोलिसांत फिर्याद दिली आहे.याप्रकरणी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ज्यावेळी सहितीने आत्महत्या केली होती. त्यावेळी तिच्या आत्महत्येचे कारण समजू शकले नव्हतं. त्यामुळे पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केलेली होती. मात्र, पोलिसांना पुरावा म्हणून सहिती हिने तिच्या मोबाईलमध्ये अनेक रेकॉर्डिंग आणि मेसेज पाठवले आहेत. याशिवाय तिने तिच्या काही जवळच्या मित्रांना देखील शेअर केले होते. त्यात तिने स्वतःचा मोबाईल कुठे ठेवला आहे आणि याचा पासवर्ड देखील सांगितला होता. यामुळे सर्व हकिकत समोर आली आहे. या घटनेने सर्वांना मोठा धक्का बसला.

# शिरोली बु. येथील न्यू इंग्लिश स्कूलच्या १६ विद्यार्थ्यांना राज्य पुरस्कार

**ओझर । प्रतिनिधी**

शिरोली बु. (ता. जुन्नर) येथील न्यू इंग्लिश स्कूल विद्यालयातील इयत्ता १० वी मधील ८ स्काऊट व ८ गाईड असे एकूण १६ विद्यार्थी भारत स्काऊट गाईड राज्य पुरस्कार चाचणी परीक्षेत उत्तीर्ण झाले असल्याची माहिती शाळेचे मुख्याध्यापक प्रसाद हांडे यांनी दिली. या विद्यार्थ्यांनी २ ते ५ जानेवारी व ७ ते १० जानेवारी या कालावधीत राज्य पुरस्कार चाचणी शिबीर भारत स्काऊट गाईड राज्य प्रशिक्षण केंद्र रामबाग (ता. भोर) येथे आयोजित करण्यात आले होते.



या कालावधीत विविध उपक्रम तसेच विविध घटकांचे प्रात्यक्षिक व लेखी चाचणी घेण्यात आली. त्यावेळी विद्यार्थ्यांनी तंबू (टेंट) उभारणी व सजावट, प्रथमोपचार, आपत्ती व्यवस्थापन, वृक्षसंवर्धन, (बागकाम), पाककृती, स्काऊट गाईड ध्वजारोहण अशा विविध उपक्रमात सहभाग घेतला होता. त्यानुसार गुणदान करण्यात आले.

या विद्यार्थ्यांना इयत्ता १० वी परीक्षेत ३ अतिरिक्त गुण मिळणार आहेत. याकरिता विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रसाद हांडे सर, पर्यवेक्षक तथा गाईड कॅप्टन अनघा घोडके, स्काऊट गाईड विभाग प्रमुख रंजना मुंढे, गाईड कॅप्टन प्रियंका पादीर, शोभा कवडे, रुपाली नलावडे स्काऊट मास्टर अक्षय पाटोळे, जनार्दन खेडकर यांनी मार्गदर्शन केले.

# लोणी काळभोर येथे हातभट्टीवर कारवाई

**उरुळी कांचन । प्रतिनिधी**

लोणी काळभोर (ता. हवेली) परिसरात सुरु असणाऱ्या दारूच्या हातभट्टीवर छापा टाकून लोणी काळभोर पोलिसांनी एकाला ताब्यात घेऊन त्याच्या साथीदारावर गुन्हा दाखल केला. या कारवाईत पोलिसांनी २ लाख ३० हजाराची दारू व इतर मुद्देमाल जप्त केला आहे.

बनफुल बादशहा राजपूत (रा. कोळपेवस्ती, रामदरा रोड, लोणी काळभोर, ता. हवेली) असे पोलिसांनी ताब्यात घेतलेल्याचे नाव आहे, तर संदीप बादशहा राजपूत (रा. वाडेबोल्हाई, ता. हवेली), असे गुन्हा दाखल केलेल्याचे नाव आहे. लोणी काळभोर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, लोणी काळभोर पोलिस ठाणे हद्दीतील अवैध धंद्यांवर धडक कारवाई मोहीम सुरु असताना सोमवारी (ता. १६) दुपारी अडीचच्या सुमारास लोणी काळभोर परिसरातील रामदरा रोड, कोळपे वस्ती येथील कालव्याच्या शेजारी पाटबंधारे विभागाच्या जागेतील झाडाझुडपांमध्ये गावठी हातभट्टी दारू तयार करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार, पोलिसांनी छापा टाकल्यानंतर बनफुल राजपूत हा पोलिसांच्या हाती लागला. त्याच्याकडून हातभट्टी दारू तयार करण्याचे रसायन व दारू विक्री करण्याच्या साहित्यासह दुचाकी, असा एकूण २ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

# लोणीकाळभोर, सासवडपर्यंत मेट्रोचे जाळे विस्तारणार

**पुणे । प्रतिनिधी**

शहराच्या पूर्व भागातील वाहतूक समस्या गंभीर होत असून, याठिकाणी आता मेट्रोचा पर्याय समोर आला आहे. हडपसर ते लोणीकाळभोर आणि हडपसर ते सासवड या दोन मार्गावर मेट्रो धावणार आहे. त्यासाठीच्या प्रस्तावास पुणे महापालिकेच्या स्थायी समितीने व मुख्यसभेने मान्यता दिली आहे. या प्रकल्पासाठी ५ हजार ७०४ कोटी रुपयांचा खर्च येणार आहे. तर पुणे महापालिकेला भूसंपादनासाठी केवळ ३.६० कोटी रुपयांचा खर्च येणार आहे.



पुणे शहरासह उपनगरे, ग्रामीण भागात पायाभूत सुविधांसह सार्वजनिक वाहतूक मजबूत करणे आवश्यक आहे. त्यामुळे पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) आणि महामेट्रोतर्फे पुणे महापालिकेची हद्द आणि पीएमआरडीएच्या हद्दीसाठी सर्वंकष वाहतूक विकास आराखडा तयार केला आहे. या आराखड्यानुसार पुणे शहराचा भविष्यात होणारा विस्तार आणि विकास लक्षात घेऊन नवीन मेट्रो मार्गांचा विस्तार आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.

पुणे एकिकृत महानगर परिवहन प्राधिकरण ( पुम्टा )च्या बैठकीत हडपसर ते लोणी काळभोर आणि हडपसर ते सासवड रेल्वे स्थानक या दोन मेट्रो मार्गिकाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार हा प्रकल्प अहवाल तयार केला आहे. या अहवालास महापालिकेच्या मुख्यसभेने मान्यता दिली आहे.

केंद्र व राज्य शासनाने हा प्रस्ताव मंजूर केल्यानंतर पुणे महापालिका महामेट्रोसोबत करारनामा करून भूसंपादनासाठी ३ कोटी ६० लाख रुपये देणार आहे. या दोन्ही विस्तारित मार्गांसाठी केंद्र आणि राज्य सरकारकडून निधी दिला जाईल व उर्वरित निधी कर्जाच्या स्वरूपात उपलब्ध होणार आहे. त्याचे कोणतेही दायित्व महापालिकेवर येणार नाही असे या प्रस्तावात नमूद केले आहे.

# मराठी भाषेचे संवर्धन ही काळाची गरज : राजेंद्र शास्त्री

**भोर । प्रतिनिधी**

'सद्य:स्थितीत मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला असला, तरीही मराठी भाषेचे संवर्धन ही काळाची गरज निर्माण झाली आहे,'' असे प्रतिपादन राजा रघुनाथराव विद्यालयातील शिक्षक राजेंद्र शास्त्री महाराज यांनी व्यक्त केले. येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयात मराठी भाषा संवर्धनानिमित्त झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, भोर तालुका विधी सेवा समिती व वकील संघटनेच्यावतीने मराठी भाषा संवर्धन कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

भोरच्या दिवाणी न्यायालयाच्या प्रमुख न्यायाधीश नेहा नागरगोजे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास वकील संघटनेचे उपाध्यक्ष ड. शिवाजी पांगारे, ज्येष्ठ ड. सोपान कोंढाळकर, त्रिंबकराव देशमुख, शिवाजी मरळ, मदनमोहन ठाकोर, राजश्री बोरगे, प्रकाश लाड, सुरेश शिंदे, राजेंद्र खोपडे, विश्वनाथ रोमण, मयूर धुमाळ, अजिंक्य मुकादम, दत्तात्रेय उरणकर, उदय कोंढाळकर, यशवंत शिंदे, सचिन बागल, राकेश कोंडे, संजय कोचळे, गणेश डिंबळे, धीरज चव्हाण, साहिल मुकादम, न्यायालयाचे सहायक अधिक्षक नामदेव बोत्रे, कैलास आखाडे उपस्थित होते.राजेंद्र शास्त्री यांनी मराठी भाषेचा उदय आणि मराठी भाषेचा इतिहास याबाबत माहिती दिली. वकील संघटनेच्या सचिव ड. मनीषा तारू यांनी प्रास्ताविक तर ॲड. जगन्नाथ चिव्हे यांनी सूत्रसंचालन केले. ड. विजय दामगुडे यांनी आभार मानले.

# राहुल गांधी यांना पुणे कोर्टाचा दिलासा

पुणे । प्रतिनिधी

स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याविषयी वादग्रस्त वक्तव्य केल्याप्रकरणी दाखल प्रकरणात पुणे न्यायालयाने लोकसभेचे विरोधी पक्षनेते व काँग्रेस नेते राहुल गांधी यांना दिलासा दिला आहे. गांधी यांनी वकिलांमार्फत दाव्याच्या सुनावणी दरम्यान न्यायालयात स्वतः हजर राहण्यापासून कायमस्वरूपी सूट मिळावी असा अर्ज केला होता. विशेष न्यायाधीश अमोल शिंदे यांनी मंगळवारी ( दि. १८) अटी शर्तीवर गांधी यांचा अर्ज मंजूर केला आहे.



राहुल गांधी यांनी स्वातंत्र्यवीर सावकर यांविषयी वादग्रस्त विधान केल्यावरून सावरकरांचे नातू सात्यकी सावरकर यांनी राहुल गांधींविरोधात न्यायालयात मानहानीचा दावा दाखल केला आहे. याप्रकरणात राहुल गांधी यांना न्यायालयात हजर राहण्यासाठी दि. १० जानेवारीची तारीख दिली होती. त्यानुसार राहुल गांधी हे न्यायालयात व्हिडीओ कॉन्फरसिंग द्वारे हजर झाले होते. मानहानीच्या दाव्यात राहुल गांधी यांना वैयक्तिक २५ हजार रुपयांच्या जात मुचलक्यावर न्यायालयाने जामीन मंजूर केला होता. दरम्यान, राहुल गांधी यांचे वकील ड. मिलिंद दत्तात्रय पवार यांनी या दाव्यात राहुल गांधी यांना सुनावणी दरम्यान न्यायालयात स्वतः हजर राहण्यापासून कायमस्वरूपी सूट मिळावी असा फौजदारी न्याय संहिता कलम २५८ अन्वये न्यायालयात अर्ज दाखल केला होता. त्यावर आरोपी त्याच्या ओळखीवर वाद घालणार नाही, आमच्या वकिलांच्या अनुपस्थितीत या प्रकरणातील पुरावे नोंदविले गेले आहेत असा आक्षेप घेणार नाहीत. तसेच सुनावणीदरम्यान आरोपीचे वकील आरोपीला वेळोवेळी आवश्यक सूचना देतील. अशा अटी शर्तींवर विशेष न्यायालयाने राहुल गांधी यांचा अर्ज मंजूर केला. दाव्याची पुढील सुनावणी समरी ट्रायल ऐवजी समन्स ट्रायल म्हणून घ्यावी. सावरकर यांचे ब्रिटिशांकडून स्वातंत्र्य मिळवण्यात फार मोठे योगदान होते असे सात्यकी सावरकर यांनी दाखल केलेल्या त्यांच्या तक्रारीत नमूद केलेले आहे. सावरकरांचे स्वातंत्र्य मिळवण्यातील योगदान व त्या अनुषंगाने अजून बऱ्याच काही महत्त्वाच्या ऐतिहासिक घटना न्यायालया समोर येणे राहुल गांधी यांना नैसर्गिक न्याय मिळण्याच्या दृष्टीने फार महत्त्वाच्या आहेत. म्हणून कायद्यातील तरतुदींनुसार या खटल्याची पुढील सुनावणी समरी ट्रायल ऐवजी समन्स ट्रायल म्हणून घ्यावी. सद्य परिस्थितीत न्यायालयात या खटल्याची नोंद न्यायालयाचे निबंधक यांनी चुकीने समरी ट्रायल अशी चुकीची केली आहे.

खटल्याच्या नोंदीचे परिवर्तन फौजदारी न्याय संहिता कलम २५८ नुसार समरी ट्रायलऐवजी समन्स ट्रायल मध्ये करावे. म्हणजे या खटल्यात बचाव पक्षाला विस्तृतपणे सखोलपणे तक्रारदार यांचा उलट तपास घेता येईल. ब्रिटिशकालीन स्वातंत्र्यपूर्व काळातील महत्त्वाचे ऐतिहासिक दस्तऐवज या खटल्याच्या पुराव्या कामी न्यायालयासमोर सुनावणी दरम्यान न्यायालयात मागवता येतील. म्हणून समन्स ट्रायल नुसार या खटल्याची सुनावणी व्हावी असा अर्ज राहुल गांधी यांचे वकील ड. मिलिंद पवार यांनी दाखल केला. ॲड. पवार यांनी दाखल केलेल्या अर्जावर फिर्यादी सात्यकी सावरकर यांचे लेखी स्वरूपात म्हणणे न्यायालयाने मागविले असून, त्यावर खटल्याची पुढील सुनावणी दि. २५ फेब्रुवारी रोजी होणार आहे.

# चोरट्यांनी मॉलमधून चोरला १ लाखाचा मोबाईल; पोलिसांकडून तपास सुरू



पुणे । प्रतिनिधी

मॉलमधील मोबाइल विक्रीच्या दुकानातून चोरट्यांनी १ लाख ३० हजारांचा मोबाइल चोरुन नेल्याची घटना सेनापती बापट रस्त्यावर घडली. याप्रकरणी चतु:शृंगी पोलिसांनी चोरट्यांवर गुन्हा दाखल केला. याबाबत ३२ वर्षीय तरुणाने चतु:शृंगी पोलिसांत तक्रार दिली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, तक्रारदार सेनापती बापट रस्त्यावरील एका मोबाइल विक्री दालनात व्यवस्थापक आहे.

मोबाइल विक्री दालनात महागडे मोबाइल ग्राहकांना पाहण्यासाठी (डिस्प्ले) ठेवले आहेत. ६ फेब्रुवारी रोजी सकाळी अकराच्या सुमारास चोरट्यांनी महागडा मोबाइल चोरुन नेल्याचे उघडकीस आले. त्यानंतर पोलिसांकडे तक्रार देण्यात आली. पोलिसांनी मॉलमधील सीसीटीव्ही तपासासाठी ताब्यात घेतले आहेत. अधिक तपास कर्मचारी शिर्के करत आहेत.